
डिसेंबर, २०२५

# आपलं मंत्रालय


एक सुसंवाद



# साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार २०२५

# ‘आभाळमाया’ची गगनभरारी

साहित्याच्या नभांगणात काही निर्मिती अशी झेपावते की तिचा तेजोमय लखलखाट दूरवर पसरत जातो. ‘आभाळमाया’ हा काव्यसंग्रह तसाच–बालमनाच्या नाजूक धाग्यांना निसर्गाच्या अथांग आभाळाशी जोडणारा आणि म्हणूनच साहित्य अकादमीचा बाल साहित्य पुरस्कार २०२५ या काव्यसंग्रहाला मिळणे म्हणजे केवळ सन्मान नव्हे, तर मराठी बालसाहित्यातील एका अधिकृत नोंद आहे.




या पुरस्कारस्वरूप मिळालेला हा ताम्रफलक आणि ५० हजारांची रोख रक्कम ही केवळ प्रतीके; पण त्यामागे उभे आहे दशकांपासून बालकांच्या हृदयाशी संवाद साधत राहिलेल्या एका कवीचे कृतिशील साहित्यकार्य. डॉ. सुरेश सावंत यांच्या लेखणीतून उतरलेल्या कविता मुलांना फक्त वाचायला नव्हे, तर अनुभवायला, स्पर्शून जाऊन आतल्या विश्वात साठवून ठेवायला प्रवृत्त करतात.

‘आभाळमाया’तील कविता आकाशाशी खेळतात, कधी ढगांतून घरंगळतात, कधी उडत्या पक्ष्यांसोबत नाचतात, तर कधी तारकांना हात लावण्याचा हट्ट करतात. बालकांचे मन हे कल्पनांचे घर. तिथे नुसते शब्द नव्हे, तर रंग, गंध, झुळूक आणि उत्साह पोहोचवणारी भाषा लागते. सावंत यांच्या लेखणीत ही भाषा जिवंत होते. मुलांच्या स्वप्नांना पंख देत ती आभाळाएवढी मोकळेपणाने उडत जाते.

डॉ. सावंत हे केवळ बालकवी नाहीत; ते एक अभ्यासू, चिंतनशील साहित्य संशोधकदेखील आहेत. ‘बालसाहित्याचा इतिहास’ असो वा समाज परिवर्तनाच्या सूत्रांवर आधारित लेखन असो वा विद्यापीठीय संशोधन त्यांच्या साहित्य प्रवासात विविध विषयांची समृद्ध पायवाट आहे, तर ‘आभाळमाया’ या कवितासंग्रहाने बालवाचकांना वास्तव आणि संवेदनशीलतेची नवी दृष्टी दिली.

या सर्व कामगिरीचा एकत्रित प्रत्यय ‘आभाळमाया’मध्ये येतो. येथे संशोधकाचा नेमका अभ्यास आणि कवीचे मृदू मन एकत्र येते. म्हणूनच या कवितांमध्ये केवळ शब्द नाहीत, तर एक निवांत ऊब आहे; एक जिव्हाळा आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलांच्या जगाकडे पाहण्याची एक निर्मळ खिडकी आहे.

साहित्य अकादमीचा हा पुरस्कार म्हणजे मराठी बालसाहित्यातील सौंदर्य, संवेदना आणि सर्जनशीलतेच्या मूल्यांना मिळालेली राष्ट्रीय पातळीवरील दाद आहे. ‘आभाळमाया’च्या रूपाने मराठी बालमनाला भेटलेले हे काव्यधन दीर्घकाळ प्रेरणा देत राहील. जगण्याकडे, निसर्गाकडे आणि कल्पनांच्या अनंत आकाशाकडे.

शब्दांची ही माया आणि आभाळाएवढी तिची कवायत, यातूनच मराठी साहित्याची नवी उंची आकार घेत राहील.

## ६ पाटी ते डिजिटल प्रवास

पाटी, फळा, व्हाईटबोर्ड किंवा डिजिटल स्क्रीनही फक्त शिक्षणाची माध्यमं आहेत; पण अक्षरांच्या मागे असलेली तळमळच खरी जीवनातील वाट दाखवते. मानव हा शेवटच्या क्षणापर्यंत शिकत राहतो, फक्त शिकण्याच्या कक्षा बदलत जातात.

## १२ बालहक्क, सुरक्षा आणि पोषण : सर्वांगीण विकासाची राज्याची वचनबद्धता

राज्यातील सुमारे तीन कोटी बालकांची निरोगी वाढ हीच आपल्या समाजाच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी आहे. आजची बालके उद्याचे नागरिक. ते सुदृढ, सक्षम आणि सुशिक्षित राहावेत, यासाठी महिला व बालविकास विभाग विविध स्तरावर अनेक योजना राबवत आहे. ग्रामीण, शहरी आणि दुर्गम भागातील प्रत्येक मुलापर्यंत पोषण, आरोग्य, शिक्षण आणि संरक्षणाची मूलभूत सेवा पोहोचविण्याचे सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

## १६ मुसाफिर हु यारों

'कल हो ना हो' चत्रपटाच्या एका गाण्यात आयुष्याचे किती मोठे सार सांगितले आहे. याच 'हर पल यहा जी भर जीयो' या वाक्याला आयुष्याचा Moto ठरवून मी २०२४ या वर्षाला सुरुवात केली होती. युरोपवारी या माझ्या सर्वांत मोठ्या स्वप्नाच्या पूर्ततेनंतर आता फिरण्याचा आनंद नव्याने मोहवत होता

## २२ गणूचं प्रजासत्ताक!

चाळीतली वस्ती. सर्वच जन कामगार. सर्वांची कुटुंबेदेखील मोठीच. किंबहुना छोटे कुटुंब, सुखी कुटुंब ही संकल्पनाच त्याकाळी फारशी अस्तित्वात आली नव्हती. प्रत्येक घरात किमान चार/पाच लेकर, एखाद दुसरं म्हातारं माणूस असायंचंच. कामाचा गडी कामावर जायचा आणि बायकांचा सर्व पोरांच व वृद्धांच आवरता–सावरता वेळ जावून सांज होत असे आणि दिवे लागणीची वेळस घरधनी कामाहून येईल, म्हणून सांजच्या स्वयंपाकाला सुरुवात होत असे.

## २८ पर्यावरण संवर्धन आणि ईव्ही धोरण

जागतिक स्तरावर वाहन क्षेत्रात बदलाचे वारे झपाट्याने वाहत आहेत. या बदलांचा देशातील वाहन क्षेत्रातही शिरकाव झाला आहे. कुठलाही अनुकूल बदल अंगीकारून त्यामध्ये आघाडी घेण्याचा महाराष्ट्राचा हातखंडा वाहन क्षेत्रातील बदलांमध्येसुद्धा दिसून येत आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण अमलात आणण्याचा शासनाने घेतलेला निर्णय हा या बदलांचाच एक भाग आहे.

## ३४ कॅलेंडरची चित्तरकथा...

आपल्या रोजच्या जीवनात ग्रेगेरियन किंवा इंग्रजी कालमापनाचा अर्थात कॅलेंडरचा उपयोग करतो. मात्र भारतीय कॅलेंडर शक संवत्सरावर आधारित असते. आपले सगळे सण–उत्सव त्यानुसार साजरे होत असल्याने व्यावहारिक इंग्रजी कालमापनासोबतच तिथी, नक्षत्र, वारावर आधारित दिनदर्शिकेची गरज आपल्याला असते.


| | |
|---|---|
| पाटी ते डिजिटल प्रवास | ६ |
| दुबईवारी | ७ |
| परेलशी नाते | ११ |
| बालहक्क, सुरक्षा आणि पोषण : सर्वांगीण विकासाची राज्याची वचनबद्धता | १२ |
| जागतिक जैवविविधता दिन २२ मे | १३ |
| कृती शब्दांहूनी बोलकी! | १४ |
| जीवनदात्री | १५ |
| मुसाफिर हु यारों | १६ |
| देवनागरी सुलेखन भाग–६ | १८ |
| कविता | १९ |
| स्पर्श: कविता संग्रह | २० |
| बाबांच्या गर्दीतील भाऊ! | २१ |
| गणूचं प्रजासत्ताक! | २२ |
| स्थलांतर : वस्तुस्थितीचे अवलोकन | २४ |
| वचनबद्धता | २५ |
| जीव वाचवणारी देवमाणसं | २६ |
| स्मायली... | २७ |
| पर्यावरण संवर्धन आणि ईव्ही धोरण | २८ |
| एकटेपणा | ३० |
| बालाश्रम (पाळणाघर) ते वृद्धाश्रम | ३१ |
| आठवणीतील रेडिओ.../ उपवास | ३३ |
| कॅलेंडरची चित्तरकथा... | ३४ |
| हास्यकल्लोळ... | ३६ |
| सांस्कृतिक ठेवा | ३७ |
| भारतीय संविधान : राष्ट्राच्या शासनव्यवस्थेचा पाया | ३८ |

वर्ष ३ रे । अंक ९ । डिसेंबर २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# आपलं मंत्रालय

संपादन

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संकल्पना, मुखपृष्ठ — अजय भोसले
- व्यवस्थापकीय संपादक — किशोर गांगुर्डे
- संपादक — गोविंद अहंकारी
- सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
- मुद्रण — वृंदावन एंटरप्रायजेस प्रा. लि., सिडको बसस्टॉप, ठाणे (प.)

पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०० ०३२.
Email : aaplemantralay@gmail.com

फॉलो करा...www.twitter.com&MahaDGIPR
लाइक करा...www.facebook.com&dgipr

**प्रतिक्रियांचे स्वागत**

आपलं मंत्रालय या नियतकालिकाची गुणवत्ता वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आणि सूचनांचे स्वागत आहे.

**'आपलं मंत्रालय' नियतकालिक ही गृहपत्रिका असून या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.**

## महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीच्या कार्याची जागतिक पातळीवर नोंद

# 'अमृत दुर्गोत्सव २०२५' उपक्रमाला गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा मान

इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेच्या अभिनव उपक्रमाची जागतिक पातळीवर नोंद झाली आहे. संस्थेद्वारे राबविण्यात आलेल्या 'अमृत दुर्गोत्सव २०२५' या उपक्रमाने 'मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम' (Largest Online Photo Album of Handmade Sculptures) या श्रेणीत गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवून एक ऐतिहासिक कामगिरी साध्य केली आहे. या कार्याबद्दल गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करून अमृत संस्थेला सन्मानित करण्यात आले आहे.



महाराष्ट्राची गड-दुर्ग परंपरा ही राज्याच्या वैभवशाली इतिहासाचे द्योतक आहे. 'अमृत दुर्गोत्सव' या उपक्रमाचा उद्देश नव्या पिढीला या इतिहासाशी जोडणे; तसेच सांस्कृतिक स्मारकांविषयी अभिमानाची भावना निर्माण करणे हा होता. या अंतर्गत युनेस्को मान्यताप्राप्त १२ ऐतिहासिक गड-दुर्गांच्या प्रतिकृतींसह सेल्फी काढून ते दुर्गोत्सवाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

या उपक्रमाला महाराष्ट्रातील नागरिकांसह देशातील इतर राज्यांमधून आणि विदेशातूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभाग नोंदवून हा उत्सव केवळ राज्यापुरता मर्यादित न ठेवता जागतिक स्तरावर नेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

'अमृत दुर्गोत्सव २०२५'च्या माध्यमातून दुर्गसंस्कृती संवर्धनाचा हा अभिनव उपक्रम गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या मानाने अधिक उज्ज्वल झाला असून, हे यश महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीच्या कार्यास नवे अधोरेखित स्थान प्रदान करणारे ठरले आहे.

# उमलत्या शब्दाची आनंदयात्रा

जीवनाच्या विस्तीर्ण पटावर माणसांचे, निसर्गाचे, आठवणींचे, तंत्रज्ञानाचे आणि काळाच्या ओघात बदलत जाणाऱ्या वास्तवाचे अनेक प्रवाह सतत वाहत असतात. कधी मध्य प्रदेशासारख्या विविधतेने नटलेल्या राज्याची ओळख आपल्याला भारतीय संस्कृतीची खोली दाखवते, तर कधी आंबोलीच्या धुक्यातून दिसणारे हिरवेगार जंगल मनाला एका नव्या शांततेची भेट देते. या प्रवासात प्रत्येक अनुभव आपल्याशी काहीतरी बोलतो, सांगतो आणि नकळत घडवूनही टाकतो.

शब्दांना आपला विशेष अर्थ असतोच; पण काही प्रसंगी शब्दांहूनही कृती जास्त बोलकी ठरते. संकटात उभा राहणारा अनोळखी, रक्तदानासाठी धावून येणारा तरुण, रुग्णालयाच्या दारात आधार देणारा स्वयंसेवक किंवा रस्त्यावर पडलेली माणुसकी उचलणारा सामान्य नागरिक – हीच खरी 'देव माणसं'. समाजाला टिकवून ठेवणारा गाभा या लोकांकडे आहे. अशा माणसांमुळेच जीवनदाते हा शब्द केवळ विशेषण राहत नाही, तर समाजाचा हृदयस्पंद बनतो.

हेच जीवनाचे सौंदर्य आहे – कधी हलक्याफुलक्या कवितांतून उमटणारा हास्यकल्लोळ दिवसभराचा ताण पुसून टाकतो; तर कधी एखादी साधी स्माईली, शुभेच्छा किंवा दिलासा देणारा छोटा संदेश मनाच्या कोपऱ्यात प्रकाश टाकून जातो. एकटेपणाच्या जाड धुक्याला दूर सारत हे छोटे-छोटे स्पर्श जीवन अधिक अर्थपूर्ण बनवतात.

दुबईच्या चकाकणाऱ्या इमारती, संस्कृतींची मिसळणारी गर्दी आणि नव्या संधींचं आकाश, दुसरीकडे बालपणीच्या रेडिओवरून ऐकू येणारी भावगाणी हे दोन्ही अनुभव मानवी जीवनाची दोन टोकं आहेत. एका टोकाला विस्तारलेलं आधुनिक जग, तर दुसऱ्या टोकाला आठवणींचं उबदार पांघरूण. बालपणातील निष्कपट आनंद आणि वृद्धाश्रमातील शांत स्वीकार-दोन्ही जीवनाच्या चक्राला पूर्तता देणारे टप्पे. समाजाने दोघांनाही समान जपणं हीच खरी जबाबदारी.

आजच्या जगात पर्यावरण संवर्धन हा केवळ चर्चेचा किंवा उपक्रमांचा विषय राहिलेला नाही; तो अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे. आंबोलीसारख्या प्रदेशातील धुक्याची जंगले, नद्यांचे उगम, जैवविविधता ही भावी पिढ्यांची वारसा-ठेवी आहेत. प्रत्येक नागरिक, प्रत्येक संस्था आणि प्रशासन या साखळीत महत्त्वाची कडी आहेत.

तंत्रज्ञानाच्या बदलत्या लाटेत सरकारची ईव्हीसारखी धोरणं डिजिटल दारं उघडतात; परंतु या प्रगतीसोबत आर्थिक निर्णयांबाबत सावधगिरी, गुंतवणुकीची पारदर्शकता आणि माहितीची विश्वसनीयता राखणं गरजेचं आहे. विकासाच्या मार्गावर वेगापेक्षा दिशा अधिक महत्त्वाची असते.

या सर्व विषयांचे धागेदोरे एकमेकांत गुंतताना एक मोठा संदेश मिळतो-मानवी मूल्यांची, पर्यावरणाची, सांस्कृतिक ओळखीची आणि भविष्याच्या जबाबदारीची सतत जाणीव ठेवणं आवश्यक आहे. प्रत्येक अनुभव, प्रत्येक स्मरण, प्रत्येक धोरण आणि प्रत्येक कृती समाज अधिक मजबूत करण्याची संधी देते.

हे मासिक वाचकांसाठी केवळ माहितीचे साधन न राहता त्यांच्या विचारांना चालना देणारे, नवीन दृष्टी देणारे आणि कृतीकडे नेणारे एक अर्थपूर्ण सहप्रवासी ठरावे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

# पाटी ते डिजिटल प्रवास



**प्रदीप जेठवा**

शाळेच्या वर्गात भिंतीवरील काळा फळा आणि समोर बसलेले विद्यार्थी–विद्यार्थिनी असा नियमित तास आमच्या बालपणी होता. त्या काळी काळ्या फळ्यावर पट संख्या, एकूण विद्यार्थी, हजर विद्यार्थी, गैरहजर विद्यार्थी; तसेच एक सुविचार लिहिण्यासाठी एक मॉनिटर नेमलेला असायचा.

काळ्या फळ्यावर मुख्यत्वे पांढऱ्या खडूनी लिहिले जात असे. कधी–कधी रंगीत खडूचा वापरसुद्धा केला जायचा. शिक्षक फळ्यावर लिहिताना खडूचा वापर करायचे. तसेच कधी–कधी लक्ष वेधून घेण्यासाठी विद्यार्थीकडे तेच खडू भिरकवलेसुद्धा जायचे. क्वचित प्रसंगी शिक्षकाने डस्टर फेकून मारल्याच्या घटनासुद्धा घडायच्या.

असा हा काळ्या फळ्यावर पसरलेला अक्षरांचा प्रवास हा काळाच्या ओघात बदलत गेला. एके काळी दप्तरात खडूच्या तुकड्यासह विसावलेली दगडी पाटी हेच शिकण्याचे पहिले साधन होते. त्या पाटीवर उमटणाऱ्या किरकिरत्या रेषांमध्ये बालपणाच्या अक्षरांची पहिली ठाशीव ओळ हातातील बोट धरून गिरवली जायची. चूक झाली की, धवणीने पुसून नव्याने सुरुवात करणे, ही त्याकाळाची पद्धत होती. म्हणजे चुकणं ही शिकण्याची पहिली पायरी समजली जायची. जगण्याची पहिली शिस्त तेव्हा कळते, नकळत मनावर रुजवली जायची.

हळूहळू कागदाच्या शुभ्र पानांनी त्या पाटीची जागा घेतली. वहीची पाने जणू पंख उघडून विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला अधिक दूरवर घेऊन जाण्यास तयार झाली. पेन्सिलच्या मऊ रेषांनी अक्षरांना नवा आकार मिळू लागला. नटराज पेन्सिल, नटराज खोड रबर व अप्सरा वही त्याकाळी आमच्या सोबतीला असायची.

पाटीतील मर्यादित जागा आता पानाची वहीने घेतली होती व या वाटेने विद्यार्थी पुढच्या कक्षेत वाटचाल करू लागले. पहिला, दुसरा, तिसरा चौथा वर्गा पर्यंत एकाच वहित सर्व विषय लिहिले जायचे.

पाचवी इयत्तेत पाऊल ठेवताच प्रत्येक विषयासाठी नवी वही, गृह पाठासाठी नवी, प्रयोगाला नवी वही, शुद्ध लेखनाला नवी वही अशा प्रकारे दप्तरात वहींची संख्या वाढू लागली.

वर्गखोल्यांचा मध्यवर्ती आधार झालेला काळा फळा हा शिक्षणाचा फलक होता. भविष्यात तो सर्व विद्यार्थ्यांचे लक ठरवणारा गुरू होता. खडूच्या पांढऱ्या धारेने फळ्यावर अचानक फुलणारी अक्षरे म्हणजे शिक्षकांच्या जानातून उत्तरलेली प्रकाशरेषा जणू विद्यार्थीच्या ज्ञानात भर घालणारी ज्ञान रेषा होती. कधी आकृत्या, कधी गणिती सूत्र, कधी इतिहासाची वेलबुट्टी, फळ्यावर स्पर्श होईल, तसा जानाचा नवा अंकुरच नेहमी फुटत असे. खडूच्या धुरकट वातावरणातही वर्गात नेहमी एक सजीव ऊर्जा पसरत होती.

पण जसं जसा काळ पुढे सरकत गेला, काळा बोर्ड मागे पडला आता त्याची जागा व्हाईट बोर्डाने घेतली स्वच्छ, निर्मळ, धुळीपासून मुक्त, रंगीबेरंगी मार्करच्या सहज गतीने अक्षरे अधिक ठसठशीत झाली. वर्गात एक प्रकारची ताजेपणाची हवा फुलली. शिक्षकाचा हात हलता हलता काळ बदलत असल्याचे लक्षात येत गेले.

आता तर फळा म्हणजे पांढरा पृष्ठभागच नव्हे, तर स्पर्शाने जागा होणारे जादुई बोर्ड झाले. या डिजिटल बोडीवर अक्षरे नव्हे, तर जिवंत चित्रफिती, थ्रीडी आकृत्या, नकाशे, कथानक सगळं चमकून उठून दिसू लागले. विद्यार्थी फक्त ऐकत नाही, तर पाहतो, अनुभवतो, प्रश्न विचारतो आणि जगाशी थेट संवाद साधतो अशी शिक्षणाची संरचना निर्माण झाली. अक्षरांचं रूप बदललं; पण त्यातील ज्ञानाचा प्रकाश बदलला नाही.



शिक्षणाच्या या सर्व टप्प्यांतून एक गोष्ट मात्र कायम राहिली, ती म्हणजे जान दानाचे कार्य. ज्ञानाच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल माणसाला अधिक उंच, अधिक उजळ अधिक सक्षम बनवत गेले.

पाटी, फळा, व्हाईटबोर्ड किंवा डिजिटल स्क्रीनही फक्त शिक्षणाची माध्यमं आहेत; पण अक्षरांच्या मागे असलेली तळमळच खरी जीवनातील वाट दाखवते. मानव हा शेवटच्या क्षणापर्यंत शिकत राहतो, फक्त शिकण्याच्या कक्षा बदलत जातात.

**(विशेष कार्य अधिकारी, मा. उपमुख्यमंत्री)**

**पूजा दरडे**

# दुबईवारी

'दुबई' एक लखलख चंदेरी नगरी... माझ्या बकेट लिस्टमध्ये खूप वर्षांपासून संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई होतं. असं म्हणतात, किसी चीज को शिद्दत से चाहो, तो पुरी कायनात तुम्हे उससे मिलाने मे लग जाती है... त्याप्रमाणे शेवटी दुबईला कुटुंबासोबत जायचा योग आला. मुंबई ते दुबई साधारण ३ तासांचा प्रवास आहे. दुबई मुंबईच्या दीड तास मागे आहे. त्यामुळं दुबईला उतरताना माझ्या स्मार्ट वॉचने तिकडची वेळ बरोबर साधली. दुबईत पोहोचायला संध्याकाळ झाल्याने वाटेत दुबईचे गुळगुळीत रस्ते, स्वच्छ परिसर, उत्तुंग व टोलेजंग इमारती, bmw, land cruiser, mercedez benz या श्रीमंत गाड्या टॅक्सीच्या स्वरूपात दुबईच्या रस्त्यावरून १०० च्या स्पीडने धावताना दिसत होत्या. एके काळी वाळवंट असलेले दुबई राज्य केवळ पायाभूत सुविधाच्या विकासाच्या जोरावर आज दुबई अतिप्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. ज्या देशाच्या पायाभूत सुविधा अग्रेसर असतात, तो देश विकासात नेहमीच अव्वल ठरतो, हे १९९० च्या दशकात दुबईचे तत्कालीन राजे शेख राशीद बिन सईद यांनी ओळखले, म्हणूनच प्रथम त्यांनी दुबई बंदर टॅक्स फ्री म्हणून घोषित करून जागतिक कीर्तीचे व्यापार केंद्र म्हणून विकसित केले आणि त्यानंतर त्यांनी तेलाच्या निर्यातीतील पैसे infrastructure मध्ये टाकून, वाळवंटाचा कायापालट केला. भारताच्या पश्चिमेकडे UAE आहे. सात वेगवेगळ्या राज्यांनी एकत्रित येऊन UAE देश झाला आहे. या सात राज्यांनी मिळून ठरवलंय की, UAE चा प्रेसिडेंट असेल अबुधाबीचा राजा आणि पंतप्रधान असेल दुबईचा राजा. आता दुबईचे राजे आहेत शेख मोहम्मद बिन राशीद. वडिलांच्या दूरदृष्टीप्रमाणेच काळाची गरज ओळखून यांनीही दुबईला एक नंबरचे जागतिक पर्यटन केंद्र करण्याचे ठरविले आहे. त्यामुळं दुबईत जगातील सर्वात उंच इमारत, सर्वात पहिले सप्त तारांकित हॉटेल, सोन्याचे व्यापारी केंद्र, गार्डन तयार करण्यात आहेत. एअरपोर्टवरून आम्ही थेट दुबईच्या मरीना भागातील दुबई क्रिक येथे मरीना dhow cruise मध्ये पोहोचलो. हा भाग म्हणजे आपल्या मलबार हिलसारखा उच्चभ्रू समाजासाठी निवासी भाग असल्याचे कळले. हा पाण्याचा भाग डेअरा व बर दुबई या दोन भागांना जोडतो. एक मजली बोटीवर ८ वाजता आम्हाला नेण्यात आले. रात्री ९ वाजता बोट धक्क्यावरून सोडण्यात आली. बोटीवर गेल्यावर ज्यांना तळाला एअर कंडिशनमध्ये की वरच्या डेकवर ओपन एअरवर बसायचं ते विचारून बसण्याची सोय करण्यात आली. डेकवर बॉलिवूडची हिंदी गाणी लावली होती. वरती मंद तारकांसह मोकळं आकाश आणि सभोवताली दुबई क्रिकचे शांत पाणी. हवेत कुडकुडण्याइतपत गारवा होता. बोटीवर खाण्या-पिण्याची रेलचेल होती. रात्रीचे जेवण हे तिकिटात समाविष्ट असते. जेवणात अरेबिक, कॉन्टिनेंटल पदार्थ होते; पण त्याची चव काही फारशी मला आवडली नाही. आपल्याला भारतीय मसाल्यांची सवय असल्याने, त्यामुळं याबद्दल प्रत्येकाचं मत वेगळं असू शकतं. क्रिकच्या दोन्ही काठावर झगमगाट असलेल्या टोलेजंग इमारती, दुबई फ्लायर दिसले. बोटीवर पुरुष नर्तकाने अरेबीक पारंपरिक नृत्य (तानुरा) सादर करण्यात आलं. फारच छान नृत्य सादर केलं गेलं. तिथून रात्री दुबईच्या हॉटेलला मुक्कामी परतलो. आमचे हे हॉटेल दुबईतील मीना बाजार या मध्यवर्ती ठिकाणाजवळ (आपले दादर) होते. बहुतांशी भारतीय, पाकिस्तानी आणि बांग्लादेशीय येथे नोकरीनिमित्त वास्तव्यास असल्याने परदेशात असल्याची जाणीव होत नाही. दुबईला भरपूर मोटर्स असल्याने ट्रॅफिक आणि पार्किंगची समस्या प्रकर्षाने जाणवली. आमचे हॉटेल स्टेट हायवेवर असल्याने रहदारी/वर्दळ खूप होती. त्यामुळं ड्राइव्हर वक्तशीरपणे घ्यायला येतात. येथे व्हॉट्सअॅप कॉल allowed नसल्याने दुबईत संपर्कासाठी आपले मोबाइल कार्ड इंटरनॅशनली ॲक्टिव्ह करणे खूप गरजेचे आहे. अन्यथा botim किंवा vpn कॅफे हे ॲप playstore वरून



डाऊनलोड करणे आवश्यक आहे. ड्राइव्हर आपल्याला व्हॉट्सअॅपवर मेसेज करतो १५ मिनिट आधी. त्याच वेळेत आपण त्या ठिकाणी पोहोचायला हवं. आम्ही दुबई (जुनी dubai) मधील अल सीफ या ठिकाणाहून खऱ्या अर्थाने दुबईतील दिवसाच्या पर्यटनाला सुरुवात केली. अल सीफ हे ठिकाण नदीच्या काठावर असून ते जुन्या दुबई व नवीन दुबईच्या मध्यभागी आहे. जुन्या दुबईतील जुन्या वास्तू आणि नवीन दुबईच्या टोलेजंग, उत्तुंग इमारती (टॉवर) यांचा संगम या ठिकाणाहून दिसून येतो. अल सीफ या ठिकाणी पूर्वीच्या दुबईमध्ये वास्तू कशा होत्या, तेव्हा कोणकोणत्या गोष्टी वापरात असायच्या, एमीरती या मूळ वंशाच्या पुरुष व स्त्रिया परिधान करत असलेले पोशाख, वापरात असलेली भांडी आणि त्यांच्या पारंपरिक नक्षीकामाचे नमुने बघायला मिळाले. त्यानंतर आम्ही दुबई मरीना बीचकडे प्रयाण केले. हे ठिकाण शॉपिंगसाठी प्रसिद्ध आहे. जगातील पहिले सप्ततारांकित हॉटेल बुर्ज अल अरब हे जवळच होते. या हॉटेलात म्हणे सोन्याचे

बेसिन, सोन्याचे नळ आहेत. जेवणही सोन्या-चांदीच्या ताटात देतात. एअरपोर्ट पिक अप आणि ड्रॉप हेलिकॉप्टर किंवा रोल्स रॉईसने करतात, असं ड्राइव्हरकडून कळलं. आम्ही बाहेरून हॉटेल पाहण्यात समाधान मानले. ड्राइव्हरने बुर्ज खलिफा या जगातील सर्वात उंच इमारत पाहण्यासाठीचा स्लॉट दुपारचा २.३० चा ठेवल्याने १.३० वाजता बुर्ज खलिफाच्या जवळील दुबई मॉल या खूप मोठ्या मॉलला सोडले. या मॉलचे पार्किंग ११ मजली आहे. त्यावरून त्याची भव्यता कळू शकेल. जगातील सर्वात उंच इमारतीचा (८२९ miter) अनुभव घेण्यासाठी आम्ही बुर्ज खलिफाच्या तळाशी दुपारी २.२० ला उभे राहिलो. इथे prime time आणि नॉन prime time स्लॉट आहेत. Prime time म्हणजे सूर्योदय आणि सूर्यास्तची वेळ. त्याचे रेट खूपच महाग आहेत. इमारत १६३ मजल्यांची असून, त्यापैकी १२४ व १२५ व्या मजल्यावर जाण्यासाठी साधारण १५७ दिन्हाम म्हणजे अंदाजे ३,८०० भारतीय रुपये इतके तिकीट नॉन प्राईम टाइमचे होते. १६३ व्या मजल्यावर कोणालाच सोडले जात नाही. १४८ व्या मजल्यावर at the top sky होते त्याचे तिकीट चौपट होते. या इमारतीला ५७ फास्ट लिफ्ट्स आहेत आणि ८ फास्ट एसक्लेटर आहेत. या इमारतीच्या दुसऱ्या भागात निवासी घरे, हॉटेल्स आहेत, जी जगातील महागडी म्हणून ओळखली जातात. ही इमारत २००४ ला सुरू होऊन २०१० ला पूर्ण झाली. आम्ही रविवारी गेलो म्हणून की काय खूपच गर्दी होती. १२४ मजल्यावर जाणाऱ्या लिफ्टपर्यंत पोहोचायलाच आम्हाला पावणे दोन तास लागले. पायाचे तुकडे पडणे, पाय दुखणे, खडा पारसी या सर्व म्हणींचा अर्थ उमगला. आपल्या भारतात हल्ली बऱ्याचशा प्रसिद्ध ठिकाणी अशा मोठ्या रांगा लागल्या तर रांगेलगत स्टिलच्या बाकांची सोय केलेली दिसते; पण या प्रगत इमारतीत बसण्याची सोय का केली नसावी याचा उलगडा झाला नाही. लिफ्ट १ मिनिटात १२४ व्या मजल्यावर पोहोचते. थोडक्यात लिफ्टचा स्पीड १० मीटर पर सेकंडचा आहे. १२४ व्या मजल्यावर निरीक्षण डेकला पोहोचल्यावर सर्व थकवा निघून गेला. गर्दीमुळे नॉन प्राईममधून आम्ही प्राईम टाइममध्ये १२४ व्या मजल्यावर निरीक्षण डेकला पोहोचलो हा मोठा फायदा आम्हाला झाला. या निरीक्षण डेकवर बरेच टेलिस्कोप ठेवले आहेत. ज्यातून तुम्ही आजूबाजूचा परिसर पाहू शकता. असं म्हणतात, भरती-ओहोटी आणि आजूबाजूचा परिसर प्रदूषणमुक्त असल्यास इराणचा भूभाग दिसतो. असो... माझे जगातल्या उंच इमारतीवर जाण्याचे स्वप्न पूर्ण झाले यातच मी खूश झाले. इथे थांबण्यावर मर्यादा दिसून आली नाही. या इमारतीच्या लगत असलेल्या दुबई मॉलमधील दुबई फाऊंटेन बघायला निघालो. दर अर्धा तासाने light and music शो द्वारे हे दुबई फॉऊंटेन पाहायला मिळते. बुर्ज खलिफा समोरील कृत्रिम तलावावर कोरिओग्राफ केलेली कारंजी प्रणाली केली आहे. हे खूपच सुंदर वाटले. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकरच आम्ही पाल्म जुमेराहकडे निघालो. दुबईच्या चकचकीत रस्त्यावर तुफान वेगाने चालणाऱ्या आलिशान कारमध्ये पोटातील पाणीही हलत नाही, हे ड्राईव्हरचे कौशल्य म्हणायचे की, कारचे वैशिष्ट्य. पाल्म डेकवर जाण्यासाठी ड्राइव्हरने आम्हाला अटलांटीस या मोनोरेलच्या स्टेशनजवळ सोडले. त्याने आधीच मोनो रेलचे तिकीट ऑनलाइन काढल्याने कोड स्कॅन करून आम्ही स्टेशनवर ट्रेनची वाट पाहत होतो. साधारण साडेपाच किमी लांबी एवढी व्याप्ती या मोनोरेलची आहे. आपल्या मेट्रोसारखी ही ट्रेन असून, दोन्ही बाजूला पाल्म जुमेराह लगतच्या परिसराचे दृश्य दिसते. हे मानवनिर्मित बेट असून त्याचा आकार पाल्म वृक्षासारखा दिसतो. हा परिसर हा आलिशान बंगल्यांसाठी (अंबानी, शाहरुख खान), उच्चभ्रू हॉटेल्स, रेस्टॉरंटसाठी प्रसिद्ध आहे. इथे atlantis हे प्रसिद्ध आलिशान हॉटेल, रिसॉर्ट आहे. आजूबाजूचा परिसर बघून आम्ही भुयारी कोस्टल रोडने पुन्हा दुबईच्या दिशेने निघालो. त्यानंतर आम्ही पाल्म जुमेराहच्या view of palm tower मधील observatory डेकवर गेलो. येथून ३६० डिग्री view मिळतो. यात डिजिटल aquarium आहे. ५२ व्या मजल्यावर हा observatory deck आहे. इथेही prime आणि non prime time स्लॉट आहेत. त्याप्रमाणे तिकीट दर आहेत. पाल्म जुमेराहवरून आम्ही दुपारी बाहेरच जेवून डेझर्ट सफारीसाठी निघालो. ही सफारी साधारण ४.३०च्या सुमारास शारजाहच्या जवळच्या अल अविर रोडच्या बाजूस पसरलेल्या वाळवंटात करतात. Desert सफारीसाठी लँड क्रूझर कार होती आणि



चालवणारे अरबी वेशातील पेशावरी तरुण होते. याला dune bashing असेही म्हणतात. फारच चित्तथरारक (थ्रीलिंग) अनुभव होता तो. आपली कार वाळूवरून कलंडते की काय, असं प्रत्येक वेळी वाटत होते. जीव मुठीत घेऊनच आम्ही बसलो होतो. हे सर्व ड्राइव्हर खूपच सराईत/अनुभवी होते. या कारमध्ये विशिष्ट स्वरूपाची अंतर्गत रचना असते जेणेकरून कोणताही अपघात झाल्यास जीवितहानी होऊ नये. सूर्य अस्ताला जाताना काही फोटोग्राफी करून आम्ही आम्हाला allot केलेल्या desert कॅम्पला पोहोचलो. गेल्याबरोबर आम्हाला आमच्यासाठी राखीव टेबलवर बसवलं. मैदानात फेरफटका मारताना मला उंट दिसले. वाळवंटात उंटावरची स्वारी करायची हौस आम्ही उभयतांनी भागवून घेतली. त्यासाठी अतिरिक्त दिऱ्हाम खर्ची

पाडले. खूप छान वाटलं. मुंबईत समुद्रावर फिरण्याचा ५ मिनिटांचा अनुभव आणि भर रात्री, मोकळ्या आकाशाखाली फिरण्याचा आनंद वेगळाच. आतल्या मैदानाच्या मध्यभागी स्टेज उभारलेले होते. त्यावर विविध मनोरंजनाचे कार्यक्रम दाखविण्यात आले. ज्यात त्यांचा तनुरा डान्स, बेली डान्स, फायर शो, मेंदी लावणे, त्यांचे पारंपरिक पोशाख घालण्यासाठी ठेवले होते. अमर्यादित सॉफ्ट ड्रिंक्स, चहा, कॉफी होती. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी कांद्याची भजी, बटाटा भजी खायला देण्यात आली. जेवण मुख्यत्वे barbeque वर केलेले होते. मला जेवण तितकेसे बरे वाटले नाही; पण वाळवंटात आणखी चांगले काय



मिळणार हा विचार करून थोडंसं खाल्लं. साधारण ९ वाजता आम्ही पुन्हा दुबईसाठी निघालो. दुसऱ्या दिवशीची सकाळ छान झाली ती पावसाळी वातावरणामुळं. दुबईत येऊन सकाळी पावसाळा, दुपारी उन्हाळा आणि रात्री हिवाळाचा अनुभव घेता आला. आज आम्ही अबुधाबीला सकाळी ब्रेकफास्ट करून निघालो. दुबई अबुधाबी अंतर साधारण १५० किमीचे असेल. मोकळे रस्ते, कारचा वेग छान असला तर दीड तासात अबुधाबीला पोहोचता येतं. सर्वप्रथम आम्ही BAPS श्री स्वामी नारायण मंदिराला भेट दिली. १४ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रधानमंत्री या हिंदू मंदिराच्या उद्घाटनासाठी अबुधाबीला आले होते. एका मुस्लीमबहुल देशाच्या राजाने मंदिर बांधण्यासाठी जमीन, तर दिलीच; पण या मंदिराच्या सुरक्षेची जबाबदारीही घेतली आहे. श्री स्वामी नारायण संस्थेमार्फत याचा कारभार पाहिला जातो. मंदिर भारतातील अन्य श्री स्वामी नारायण मंदिरासारखेच बांधले गेले आहे. अतिशय सुंदर मंदिर असून, गर्भगृह पूर्ण एअरकंडिशन केले आहे. आलेल्या प्रत्येक भाविकाला प्रसाद खायला दिला जातो. या मंदिरात ड्रेसकोड आहे. महिलांनी तोकडे कपडे घालू नयेत असा दंडक आहे. त्यामुळं शक्यतो या मंदिरात जाताना तशी खबरदारी घ्यावी. तिथून साधारण २० मिनिटांवर यास आयलंड आहे. तिथं वेगवेगळ्या प्रकारचे थीम पार्क आहेत. तुमच्या आवडीप्रमाणे तुम्ही थीम पार्क निवडावं. आम्ही सी–वर्ल्ड थीम पार्कला गेलो. फेरारी वर्ल्ड असेही थीम पार्क होते. फेरारीचे मॉडेल्स, त्या वेगाचे वेगवेगळे गेम झोन त्यात होते, त्यामुळं मी ते टाळलं. वॉर्नर ब्रदर्स हे ही थीम पार्क होते, जे साधारणतः batman, स्पायडरमनसारख्या characters च्या थीमवर होते. सी–वर्ल्ड खूपच आवडले मला. मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर एकदा वाटलं की, आपण पऱ्याच्या राज्यात आलोय की काय. फेअरी टेलसारखं वाटलं अगदी. सी–वर्ल्डमध्ये जलचरांच्या अनेक प्रजाती होत्या. अतिशय स्वच्छ आणि वेल प्लॅनड पार्क आहे हे. यास आयलंडमध्ये फेरारी वर्ल्ड थीम पार्क, वॉर्नर ब्रदर्स हेही थीम पार्क आहेत. सी–वर्ल्डमध्ये संपूर्ण दिवससुद्धा कमी पडेल. दुपारी बाजूच्या यास या प्रचंड मॉलमध्ये जाऊन जेवण (इकडची सुंदर बिर्याणी) घेतले. त्याचवेळी अचानक अबुधाबीचे वातावरण बदलून वादळ सुरू झाले. आजूबाजूची वाळू चक्रीवादळामध्ये गोल–गोल फिरताना दिसत होती. ड्राइव्हरने आम्हाला सकाळीच सांगितलं होतं की, आखलेले कार्यक्रम वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळं आम्हीही ड्राइव्हरचे ऐकून वेळेत निघालो. नाही–नाही म्हणता, एव्हाना दुबईत येऊन ४ दिवस कसे भुर्रर उडून गेले ते कळलं नाही. आजच्या सकाळी लवकर ब्रेकफास्ट घेऊन आम्ही दुबई फ्रेम पाहण्यासाठी तयार झालो. दुबई फ्रेम झबील पार्क या भागाजवळ आहे. दुबईत आल्यापासून रोज सकाळ, संध्याकाळ रात्र दुबई फ्रेम आणि बुर्ज खलिफाचे दर्शन व्हायचे. दुबईमध्ये फिरताना किंवा दुबईमधून बाहेर जाताना नेहमीच ही जोडगोळी बघायची सवय झाली होती. दुबई फ्रेम ही संपूर्ण काचेची पारदर्शक स्वरूपाची ४८ मजली इमारत असून, तिचा आकार फ्रेमच्या स्वरूपाचा आहे. ही इमारत १५० मीटर उंच आणि साधारण ९६ मीटर रुंद आहे. ज्याच्या शेवटच्या मजल्यावरील observatory मधून जुनी आणि नवीन दुबई दृष्टीस पडते. जुन्या दुबईतील बसक्या वास्तू आणि नवीन दुबईतील उत्तुंग टॉवर्स. ४८ व्या मजल्यावरील स्काय डेस्कला अवघ्या ७५ सेकंदात इथली लिफ्ट पोहोचवते. स्काय डेस्कवर मधला एक संपूर्ण पट्टा पारदर्शक काचेचा असून त्या काचेच्या पट्ट्यावरून पर्यटकांना एका टॉवरच्या टोकापासून दुसऱ्या टॉवरच्या टोकापर्यंत चालता येतं. ज्यांना उंचीवरून खाली पाहण्यात त्रास होतं असेल त्यांनी शक्यतो यावरून चालणे टाळावे. मला असा त्रास नसला तरी डर के आगे जीत है नुसार चालण्याचा मोह आवरता आला नाही. साधारण ४८ व्या मजल्यावरून चालत खालचे पार्क आणि सभोवतालचा परिसर पाहण्याचा चित्तथरारक अनुभव घेतला आणि तो खूपच छान वाटला. वरून दुबईच्या राजाचे छायाचित्र फुले आणि झाडांच्या माध्यमातून साकारल्याचे दिसले. दुबई फ्रेमनंतर आम्ही miracle गार्डनकडे वळलो. हे फुलांचे उद्यान खऱ्या अर्थाने चमत्कारी बाग आहे. दुबईच्या रेताड वाळवंटात हिरवळ आणि सुंदर फुले दृष्टिपथात पडणे हे चमत्कारिक, अलौकिक आहे. हे उद्यान १८ एकरावर उभारले असून साधारण ४५ प्रकारच्या विविध प्रजातींची साडेचार कोटी फुलांपासून विविध संकल्पना मांडल्या गेल्या आहेत. यासाठी सदर उद्यान गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये सातत्याने ३–४ वर्ष येतं आहे. या उद्यानात कार्टून characters, छान राजवाडे, आकर्षक फुलांच्या कमानी, सिंडरेला, मोर, विमानाच्या प्रतिकृती फुलांनी केल्या आहेत. यातले एमीरेट्स कंपनीचे एअरबस ३८० ला जगातील सर्वात मोठ्या फुलांच्या स्थापन करण्याचा दर्जा प्राप्त झाला

आहे. या सर्वांसाठी लागणाऱ्या पाण्यासाठी सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यात येत असून, ठिबक सिंचन पद्धतीने उद्यान सुंदर ठेवले जाते. Miracle गार्डनवरून आम्ही ग्लोबल विलेज या जागतिक स्वरूपात असलेल्या जत्रेला गेलो. ग्लोबल व्हिलेज हे दोन भागात मोडते. एकात बाजार आणि दुसऱ्या भागात थीम पार्क आहे. मोठ्या भागात जगातील विविध देशांचे मंडप असून, प्रदर्शनात प्रत्येक देशातील विविधता, त्यांची संस्कृती, तेथील पदार्थ, हस्तकला, वास्तुकला प्रदर्शित केली जाते. ग्लोबल व्हिलेजमध्ये प्रत्येक देशाच्या वैशिष्ट्यपूर्ण इमारतीची प्रतिकृती प्रवेशद्वारावर आहे. सर्व देशांचे स्टॉल पाहायला कमीत कमी ६–७ तास लागतील असा माझा अंदाज आहे; पण खरंच एकाच व्हिलेजमध्ये सर्व देशांना एकत्र आणण्याचे काम ग्लोबल व्हिलेजने केले आहे. आमच्या हॉटेलच्या जवळच्या मीना बाजाराजवळून जाताना खरेदीचा मोह आवरला नाही. आणि ये दिल मांगे मोर असे म्हणत तिथं खजूर, खजूर चॉकलेट, अव्वल दर्जाचे ड्रायफ्रूट, थोडेसे फ्रिज मॅग्नेट असे सोवेनियरची खरेदी करत आम्ही हॉटेलकडे परतलो.दुबई सफर संपत आली आणि असं वाटायला लागलं अजून २–३ दिवस हवे होते यार. दुबई सोन्यासाठी प्रसिद्ध आहे त्या सोन्याच्या बाजारात (Gold souk) जायचं असं आम्ही उभयतांनी ठरवलं होतं. त्याप्रमाणे दुबईतील आमची सकाळ नेहमीपेक्षा जरा जास्त लवकर उजाडली. कारने या ठिकाणी जायला साधारणत: ४० मिनिटं लागतात, असं आदल्या दिवशी कळलं होतं. स्थानिकांना विचारलं, तर त्यांनी ५–७ मिनिटं चालत गेल्यावर एका काठावरून दुसऱ्या काठावर जाण्यासाठी बोटीचा पर्याय सांगितला. या भागाला आबरा असे म्हणतात. बोटीला प्रत्येकी १ दिऱ्हाम घेतात असं सांगितलं. आतापर्यंत आम्ही दुबईत सर्वच वाहनांनी प्रवास केला होता. आता फक्त बोटीचा प्रवास राहिला होता, तोही करू या असं ठरवलं. हॉटेलपासून मीना बाजारमार्गे ७ मिनिटांत आम्ही आबराला पोहोचलो. सकाळचं वातावरण खूपचं आल्हाददायक होतं. बोटीने दुसऱ्या काठावर जाताना पक्ष्यांचे थवे उडताना दिसत होते. अवघ्या २ मिनिटांत त्या काठावर पोहोचलो. समोरच souk (मुख्य बाजाराचे) प्रवेशद्वार होते. जुन्या प्रकारची बाजारपेठ होती, अगदी अरेबियन नाईट्ससारखी. Souk म्हणजे बाजार. काही गल्ल्या भांड्याच्या बाजाराच्या तर काही कपड्याच्या, ड्रायफ्रूटच्या होत्या. मी आपलं अर्जुनासारखं एकच लक्ष्य ठेवून gold souk कडे सरसावले. मुंबईतील मस्जिद बंदरला जशा वेगवेगळ्या गल्लीत वेगवेगळे सामान मिळते, तसेच हे काहीसे होते. फक्त इथे कुठेही कागदाचा कपटा, कचरा दिसत नाही. लोक कुठेही पचकन थुंकत नाही. इकडचे कायदे खूपच कडक असल्याने कोणी त्याचा भंग करण्यास धजावत नाही. हे भारतात कधी होणार हा प्रश्न मनाला पडला. ज्या प्रश्नाचे उत्तर मिळणार नाही, तो प्रश्नच बाजूला सारायला हवा असं ठरवून आम्ही गोल्ड सूकमध्ये शिरलो. दादरच्या किर्तीकर मार्केटसारखा हा परिसर वाटला.



स्वच्छ गल्लीत दोन्ही बाजूला सोन्याची खूप सारी दुकाने दिसत होती. इथे बघू की तिथं, असं काहीसे झाले. मला सोन्याचा काही सोस/आवड नसल्याने मनावर ताबा ठेवता आला; पण ज्यांना सोनं खूप आवडतं, त्यांचं काही मन थाऱ्यावर राहणार नाही हे नक्की. इथे सोन्याच्या आभूषणापासून सोन्याचे कपडे, अबाया, बूट, चप्पल असं पाहायला मिळालं. सोन्याच्या भाव हा जागतिक स्तरावरसारखा असला तरी इथे मजुरीमध्ये खूप फरक आहे. काही ठिकाणी तर ०% मजुरी असेही बोर्ड आढळले. इकडचं सोनं हे शुद्ध स्वरूपाचं असतं. कोणी फसवेगिरी करत नाही. केलीच तर कायद्याचा बडगा आहेच. मध्ये–मध्ये सरकारकडून surprise चेकअप (आपल्या भाषेत धाडी) केली जातात. दुबईबाहेरील दुकानदार असला तर त्याला डायरेक्ट देशाबाहेर (deport) पाठवलं जाते. आपल्याकडे असे कडक कायदे का नाहीत असा मला प्रश्न पडला. ३० मिनीट फिरून डोळे भरून सोनं पाहून आम्ही पुन्हा आबराकडे निघालो. पुन्हा १५ मिनिटांत चालत हॉटेलकडे निघालो. हॉटेलजवळ मीना बाजार हा आपल्या मुंबईच्या झवेरी बाजारासारखा भाग आहे. तिथेही सोन्याची दुकाने आहेत. काही ब्रँडेड (joylukkas, तनिष्क, मलाबार, पोपले) तर काही स्थानिक. सोन्याचा दरसारखा असला तरी कॅश transaction मध्ये तुम्ही मजुरीमध्ये bargain करू शकता असं माझ्या मैत्रिणीने टीप दिली होती. ब्रँडेड दुकानातून सोनं घेतलं, तर भारतात जेव्हा तुम्ही ते exchange किंवा विकाल, तेव्हा त्यात घट (आपला वीक पॉईंट) दाखविली जातं नाही. त्यामुळं सोन्याची जुजबी खरेदी करून आम्ही हॉटेलकडे आलो. अजून एक तुम्ही रात्री १–२ वाजताही भरपूर सोन्याने मढून दुबईच्या रस्त्यावरून चाललात तरी कोणीही तुम्हाला हात लावणार नाही. मतितार्थ–चोरही कायद्याला घाबरून चोरी करत नाही. दुबई ही पेट्रोलियम कंट्री म्हणून पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. त्यामुळं एक लिटर पेट्रोल ५०–५१ रुपयाला (आपल्या चलनात) पडते आणि पाणी १ लिटर बाटली साधारणत: ५०–५५ रुपयाला पडते. पाण्यापेक्षा पेट्रोल स्वस्त अशी स्थिती इथे आहे. त्यामुळं पेट्रोल जपून नाही वापरले तरी पाणी मात्र इथे जपून वापरतात. पाणी कोठेही अगदी मॉलमध्ये फ्री मिळत नाही. यानंतर आम्ही हॉटेलला परतलो. एअरपोर्ट हॉटेलपासून अगदी ३० मिनिटांवर असल्याने वेळेत पोहोचून बॅगेजचे सर्व सोपस्कार करून मुंबईच्या flight च्या घोषणेची वाट पाहत बसलो. मध्यरात्री मुंबईच्या धरतीवर पोहोचल्यावर दुबईच्या चकचकीत दुनियेतून आपल्या स्वगृही परतल्यावर गड्या अपुला गाव बरा याचा प्रत्यय आला. अशा प्रकारे आमची दुबईवारी पूर्ण झाली.

**(अवर सचिव, महाराष्ट्र शासन.)**

# परेलशी नाते

**सुभाष नागप**

एसएससी पास झाल्यानंतर पुढे सोमयातून मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा करत असताना नाटकाचे लागलेले वेड. त्या मूळे नाट्य दिग्दर्शन,नाट्य अभिनय करत होतो. त्यात आघाडीचा अभिनेता भरत जाधव यालाही त्याच्या उमेदवारीच्या काळात 'म' नावाच्या एकांकिकेमध्ये दिग्दर्शन केले. त्यामध्ये भरत ला acting व मला दिग्दर्शन व एकांकिकेला पारितोषिके मिळाली. एका मोठ्या नाटकात नायकाची भूमिका ही केली. त्याकाळी दूरदर्शनवरील



कार्यक्रम यामध्ये छोटे-छोटे role करण्याची संधी मिळाली. त्याचवेळी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, दिल्ली येथे जाऊन नाट्यशास्त्राचे पोस्ट ग्रॅज्युएशन करावं, असं मनात आलं व त्यासाठी पदवी आवश्यक होती म्हणून पदवी मिळवायचे ठरवले. रात्र ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावीत प्रवेश घेतला. नाट्य वेड ही चालू होते.

दरम्यान नोकरी लागली. बारावीमध्ये रात्र शाळांमध्ये महाराष्ट्रात पहिला आलो. पुढे मग रुईया कॉलेज.

पदवीमध्ये रुईयाचा मेरिट स्टुडंट ठरलो, परंतु पदवी मिळेपर्यंत २६ वर्षे उलटली होती. नोकरी परमनंट झाली होती. आता नॅशनल ऑफ स्कूल ड्रामामध्ये जाण्यासाठी घरच्यांनी विरोध केला. त्यातूनच एक दिवस वयाच्या २६व्या वर्षी एमपीएससी/यूपीएससीबाबत समजले. एमपीएससी व यूपीएससी परीक्षेला ठरावीक वयोमर्यादेपर्यंतच बसता येते.

पदवी मिळवेपर्यंत माझे वय २६ वर्षे झाले होते. मला ज्यात आवड नव्हती, ते शिकण्यात आयुष्यातील चार वर्षे गेली होती. तरीही लढायचे ठरवले. नोकरी करत जोमाने अभ्यास केला. यूपीएससी pre पास केली, परंतु यूपीएससी मेन्स देता आली नाही, कारण त्याच दरम्यान एमपीएससी मेन्ससुद्धा चालू होणार होती आणि मला दोन्ही दगडावर पाय ठेवण्याचा धोका पत्करायचा नव्हता, कारण मी नोकरी करत तयारी करत होतो, म्हणून मी एमपीएससीकडे लक्ष्य दिले व एमपीएससीमार्फत ऑफिसर झालो.

१/७/९९ ला शासकीय सेवेत अधिकारी म्हणून रूजू झालो आणि पुढे ३१ मे २०२५ पर्यंतचे आयुष्य इतके busy झाले की, परेलमध्ये राहूनच परेलमध्ये व्यस्त आयुष्यामुळे मोकळेपणे फिरायला वेळ मिळत नव्हता. नोकरी, व्याख्याने, लेक्चर्स या सर्वांमध्ये busy झालो. ३१ मे २०२५ ला सेवानिवृत्त झालो. आता मोकळा श्वास, सकाळी उठून ऑफिसला जाणे नाही, फोन नाहीत, समोर फायलींचा ढीग नाही. परळ, लालबाग, दादर एरियामध्ये फिरणे होते. लहानपणीचे शाळेमधले ते दिवस आठवतात आणि अंगावरून शहारे येतात. SSC झाल्यापासून सेवानिवृत्तीपर्यंतची वर्षे कशी आणि केव्हा गेली, ते समजले नाही. सेवानिवृत्तीनंतर मी हा खरा आनंद घेत आहे, ज्या रस्त्याने मी लहानपणी चालत चालत फिरलो, त्याच रस्त्याने मी आता फिरतो. एक मस्तपैकी आनंद या एरियाचा घेता येतो. शालेय जीवनातील आठवणी. ३१ मे २०२५ पर्यंत शिक्षण, नोकरी, जबाबदाऱ्या यामुळे ज्या आनंदाला मुकलो होतो.(त्या काळात करिअर घडवणे; पण महत्त्वाचे होते.)

त्या सर्व जबाबदाऱ्या व्यवस्थित पार पाडून आता सेवानिवृत्तीनंतर मुक्त पणे हा आनंद घेत आहे. हा आनंद घेण्याचा दृष्टिकोन मला मी जे आयुष्य जगण्याचे ज्ञान शिकलो. (LIFE SKILLS) त्यातून मिळाला. प्रत्येकालाच असे आवडेल असे नाही, परंतु मला मात्र एकंदर छान वाटत आहे आणि त्याचा मी आनंद घेतो आहे.

**(माजी वरिष्ठ शासकीय अधिकारी, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, लेखक, मोटिवेशनल वक्ता, लाइफ कोच..)**

# बालहक्क, सुरक्षा आणि पोषण : सर्वांगीण विकासाची राज्याची वचनबद्धता

श्रद्धा मेश्राम

राज्यातील सुमारे तीन कोटी बालकांची निरोगी वाढ हीच आपल्या समाजाच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी आहे. आजची बालके उद्याचे नागरिक. ते सुदृढ, सक्षम आणि सुशिक्षित राहावेत, यासाठी महिला व बालविकास विभाग विविध स्तरावर अनेक योजना राबवत आहे. ग्रामीण, शहरी आणि दुर्गम भागातील प्रत्येक मुलापर्यंत पोषण, आरोग्य, शिक्षण आणि संरक्षणाची मूलभूत सेवा पोहोचविण्याचे सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.



## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना : असुरक्षित बालकांसाठी आश्रय

० ते १८ वर्षे वयोगटातील अनाथ, निराधार, बेघर आणि संकटग्रस्त मुलांना सुरक्षित संगोपन उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरते. कुटुंबासोबत किंवा संस्थेमध्ये ठेवून या मुलांना निवारा, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, मनोरंजन अशा सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. पालकांच्या आजारपणामुळे किंवा इतर संकटांमुळे बालकांची काळजी घेता न आल्यास पर्यायी कौटुंबिक देखभालही पुरविली जाते. बालकांचे संरक्षण आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाचा हा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ आहे.

## एकात्मिक बालविकास सेवा योजना : पोषण व आरोग्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न

राज्यातील लाखो बालके, गर्भवती व स्तनदा मातांना पोषण आणि आरोग्य सेवेचा लाभ देणारी ही योजना व्यापक प्रमाणावर कार्यरत आहे. राष्ट्रीय पोषण माह, स्थानिक अन्नपदार्थांचा वापर, पुरुषांचा बाल संगोपनात सहभाग, डिजिटल सेवांचा समावेश यांसारख्या उपक्रमांद्वारे कुटुंबांचा सहभाग वाढवला जात आहे. बालपणाची भूक कमी करणे आणि योग्य आहार सवयी रुजविणे, हे या योजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

## प्रधानमंत्री मातृ योजना : सुरक्षित मातृत्व आणि बालमृत्यू दर कमी करण्यासाठी पाऊल

२०१७ पासून लाखो महिलांनी लाभ घेतलेली ही योजना माता व बालमृत्यू दर कमी करण्यासाठी प्रभावी ठरली आहे. गर्भधारणेपासून ते बाळाच्या जन्मापर्यंत आवश्यक आर्थिक साहाय्य प्रदान करून पोषणात सातत्य ठेवले जाते. मुलगी जन्मल्यास प्रोत्साहनपर रक्कम देऊन समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्नही या योजनेतून होत आहे.

## पालक मेळावा : कुटुंबाचा एकत्रित सहभाग

राज्यातील अंगणवाड्यांमधून आयोजित होणाऱ्या पालक मेळाव्यांमुळे बालकांच्या मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक आरोग्याविषयी जागरूकता वाढली आहे. आई-वडील आणि कुटुंबातील सदस्य एकत्र येऊन संगोपनाच्या पद्धती शिकतात, अनुभव शेअर करतात. समुदायाने मिळून बालकांची काळजी घेण्याचा हा उपक्रम विशेष ठरतो.

## बालकामगारांची मुक्तता : सन्माननीय बालपणाची हमी

बालकामगार प्रकरणांत महिला व बालविकास विभाग, पोलीस, कामगार विभाग आणि स्वयंसेवी संस्थांचे समन्वित जाळे कार्यरत आहे. बचाव मोहिमा, छापे, पुनर्वसनाची व्यवस्था, कुटुंबांना साहाय्य, १०९८ हेल्पलाइन या सर्व माध्यमांतून मुलांना कामाच्या बेड्यातून मुक्त करून शिक्षण आणि संरक्षण दिले जाते. विविध कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी हा या उपक्रमाचा मुख्य पाया आहे.

## मिशन वात्सल्य : बालकांच्या पुनर्वसनासाठी सुरक्षित छत्र

अनाथ, त्यागलेली, पालकविरहित, अत्याचारग्रस्त किंवा रस्त्यावर राहणारी मुले.. या सर्वांना संरक्षण, निवारा आणि पुनर्वसन हा मिशन वात्सल्यचा उद्देश. बालगृह, निरीक्षणगृह, खुले निवारागृह यामध्ये या मुलांना शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. कुटुंबाधारित देखभाल प्राधान्याने दिली जाते, जेणेकरून मुलाचे वाढीचे वातावरण अधिक नैसर्गिक राहील.

## लेक लाडकी योजना : मुलगी शिक्षित झाली, तर समाज प्रगत होतो...

राज्यात मुलींचा जन्मदर वाढवणे आणि त्यांच्या शिक्षणाला चालना देणे, या उद्देशाने सुरू झालेली ही योजना मुलीच्या जन्मापासून ते तिच्या १८ वर्षांपर्यंत क्रमिक आर्थिक साहाय्य देते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी ही योजना मोठा आधार ठरत असून, मुलींच्या शिक्षणाबाबतचे बंधन कमी झाले आहे.

(विभागीय संपर्क अधिकारी)

# जागतिक जैवविविधता दिन २२ मे

चंद्रशेखर मंदाकिनी महादेव पालव

आपणच आपल्या जैवविविधतेला निर्माण केलेले आव्हान. आज एकीकडे विविध स्तरावर जंगल वाचवण्याचा प्रयत्न किंवा ठीकठिकाणी वृक्षलागवड करून ते जोपासण्याचा प्रयत्न सुरू आहे; पण त्याचबरोबर जे काही मोठे संकट आपल्या जैवविविधतासाठी उभे राहत आहे, ती म्हणजे टिकोमा, कॉसमॉस, लिली, रान तुळस, गुलतुरा, रानमारी, सुबाभूळ, वेडी बाभूळ, ग्लेरीसिडिया इत्यादींसारख्या परदेशी वनस्पती.



या वनस्पतींचे आपल्या जैवविविधतेवर मोठ्या प्रमाणात व जलदगतीने आक्रमण होत आहे. काही ठिकाणी या वनस्पतींनी प्रचंड प्रमाणात जागा व्यापल्या आहेत व तेथील जैवविविधता संपुष्टात आणली आहे. ही बाब आपल्याला लक्षात येत नाहीये. आज हेच बिट्टी, टिकोमा, कॉसमॉस, गुलतुरा, लिली हे जे काही परदेशी शोभिवंत वनस्पती म्हणून नर्सरीमध्ये आणल्या गेल्यात, त्यापैकी आपण टिकोमा, बिट्टी, लिली या वनस्पतींची महामार्गाच्या व इतर रस्त्याच्या दुभाजकामध्ये शोभिवंत वनस्पती व जनावर यांना खात नाही, म्हणून यांची मोठ्या प्रमाणात लागवड केली गेली आहे. आता याचा दुष्परिणाम बऱ्याच ठिकाणी दिसून येतोय. त्या भागातील शेतीमध्ये किंवा पडिक जमिनीवर, रानांमध्ये, वनांमध्ये व घाटांमध्ये, यांच्या बियांचे प्रसारण होऊन रोप उगवलेले आपल्याला जिकडे तिकडे सध्या दिसत आहेत. त्यामुळे तेथील स्थानिक वनस्पतींवर आक्रमण होऊन त्या नामशेष होत चाललेल्या आहेत. यामुळे ज्या गवतांवर व वनस्पतींवर अवलंबून असलेल्या उपयुक्त किटकांना पोषक वातावरण निर्माण होण्यास अडचणी येत आहेत व जनावरांना काही भागात चाऱ्याची कमतरता दिसून येते. असल्या या वनस्पतींची रस्त्याच्या दुभाजकामध्ये किंवा रस्त्याच्या दुतर्फा लागवड करताना त्याच्या घातक परिणामांविषयी नक्कीच संबंधित विभागाने सखोल अभ्यास करून मगच उपयुक्त वनस्पतींची लागवड करणे गरजेचे झालेले आहे. असल्या या वनस्पतींमुळे शेतामधील पिकांवर; पण वेगवेगळ्या प्रकारची रोगराई दिसून येते. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी कृषी विभागाला पिकांवर नवनवीन रोगाचे व उपद्रवी किटकांचे आव्हान निर्माण झालेले दिसते. कृषी विभाग व वन विभागाने पण या गोष्टींकडे गांभीर्याने बघून संबंधित विभागाला या गोष्टी निदर्शनास आणून देणे गरजेचे झालेले आहे. त्यामुळे अभ्यासपूर्वक जर त्या त्या भागात, थोडक्यात योग्य ठिकाणी आपल्याकडील योग्य त्या प्रकारची, उदाहरणार्थः– निरगुडी, पांढरपळी, धायटी, पांढरा कुडा, मुरुड शेंग, इत्यादी वनस्पतींची जर लागवड झाली, तर नक्कीच सौंदर्याबरोबर तेथील जैवविविधता टिकवण्यास आपल्याला मदतच होईल व तेथील पर्यावरणीय परिसंस्था अबाधित राहण्यास, जैवविविधतेसाठी शाश्वत वातावरण तयार होईल. खऱ्या अर्थाने ग्रीनफिल्ड मार्ग तयार होतील.

सध्या आपल्याला वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करण्याबरोबरच अशा घातक आक्रमण करणाऱ्या वनस्पतींचे उच्चाटन करण्याची गरज निर्माण झालेली आहे.

या बाबतीत ठोस पावले उचलून संबंधित विभागाने व सामाजिक स्तरावर या वनस्पतींना वेळीच आटोक्यात आणण्याची गरज आहे. आम्ही आमच्या परीने शक्य त्या ठिकाणी, याबाबतीत काम करत असतोच.

(सेवानिवृत्त आरेखक श्रेणी १, रेखाचित्र शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग.)

**चंद्रशेखर पालव**

# कृती शब्दांहूनी बोलकी!

*What I do is important!*

२ जूनच्या सायंकाळी ओडिशातील बालासोरमध्ये उगवलेला चंद्र जणू दुसऱ्या दिवशीच्या पौर्णिमेच्या तयारीत असावा, इतका सुंदर दिसत होता; परंतु त्या चंद्राच्या अगदी समोरच मानवी जीवनावर मृत्यूचे काळे वादळ घोंगावत येत होते. श्वासांच्या चंद्राला ग्रहण लागताना आकाशातील चंद्र हताश होऊन पाहत होता! काहीच क्षणांमध्ये खग्रास अवस्था झाली आणि काळोख पसरला. किंकाळ्यांनी आसमंत थरथरून गेलेला असताना त्याला सावरायला कुणीतरी धावून यायला हवं होतं... आणि तसं कुणीतरी धावत आलंच!

दत्तात्रय भाऊसाहेब शिंदे त्यांचं नाव. जीवघेण्या रेल्वे अपघाताची खबर मिळाल्याक्षणापासून केवळ चाळीस-पंचेचाळीस मिनिटांत जिल्हाधिकारी तथा जिल्हा न्यायदंडाधिकारी, भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी दत्तात्रय भाऊसाहेब शिंदे दुर्घटनास्थळी पोहोचले! घटनास्थळाकडे वेगाने जात असताना जसजशी त्यांना घटनेच्या गांभीर्याची माहिती मिळत गेली तसतसे त्यांनी आपलं प्रशासकीय आणि संपर्क कौशल्य पणाला लावून योजना आखल्या. तीनपैकी दोन रेल्वेगाड्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या... याचा अर्थ जीवितहानी मोठ्या प्रमाणावर असेल, याचा अंदाज बांधून साहेबांनी परिसरातील थोड्याथोडक्या नव्हेत, तर शंभरपेक्षा अधिक रूग्णवाहिका उपलब्ध करून घेतल्या. जवळच्या सर्वच्या सर्व रूग्णालयांना हाय अलर्टवर आणले. उपलब्ध असलेले सर्व वैद्यकीय अधिकारी कार्यक्षेत्रात कार्यरत असतील, अशी तजवीज केली. संपूर्ण बालासोर जिल्हा प्रशासकीय यंत्रणा युद्धपातळीवर कामाला लावली. घटनास्थळी पोहोचताच परिस्थितीचा आढावा घेतला आणि भारतीय सेनेकडे मदत मागितली. एका रेल्वेगाडीत अडकून पडलेल्या बी.एस.एफ.च्या दहा जवानांनी स्वत: जखमी असूनही प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी कंबर कसली!



अशावेळी बघ्यांची गर्दी उपद्रवक्षम असते; पण याच गर्दीला शिंदे साहेबांनी मोठ्या कौशल्याने प्रोत्साहित करून कामाला लावले. जखमींना रूग्णालयात पोहोचवण्याला सर्वाधिक प्राधान्य दिले. मृतदेह सरकारी रूग्णालयांत हलवण्यात वेळही गेला असता आणि जखमींना घेऊन जाण्यासाठी रूग्णवाहिका कमी पडल्या असत्या. गेलेल्यासाठी शोक करीत न बसता राहिलेल्यांसाठी सर्व ताकद वापरण्यावर भर दिला. जवळच्याच एका शाळेच्या इमारतीत उपलब्ध असलेल्या जागेत सर्व मृतदेह व्यवस्थित ठेवण्याची सूचना दिल्या. मृतदेहांची उत्तरीय तपासणी ही आत्यंतिक महत्त्वाची प्रक्रिया असते. तज्ज्ञ डॉक्टरांसाठी उत्तरीय तपासणीची सर्व व्यवस्था त्याचठिकाणी केली गेली. अपघाताच्या तीव्रतेमुळे मृतदेहांची अवस्था अत्यंत शोचनीय झालेली असल्याने आणि ओळख पटविणे कायद्याच्या दृष्टीने योग्य व्हावे, यासाठी मृतदेहांची डी.एन.ए.नमुने घेण्याचे आदेशही लगोलग दिले गेले. शिंदे साहेब बालासोरमधील माणसांना 'माझी' माणसं, माझ्या रक्ताची माणसं असं संबोधतात. याच रक्ताला त्यांनी आवाहन केलं आणि अपघातात वाहून गेलेल्या रक्तापेक्षा थेंबभर जास्तच रक्तदान केलं गेलं... इतकं की, रक्त साठवण क्षमता संपुष्टात आल्यानं रक्तदात्यांना माघारी पाठवावं लागलं. अपघातग्रस्तांसाठी सर्व रुग्णालयांत, सर्वच रुग्णांवर मोफत उपचार होतील, अशा स्पष्ट सूचना दिल्या गेल्या. हे सर्व नियोजन आणि अंमलबजावणी करत असताना वृत्तवाहिन्यांचा ससेमिरा, अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी सुरू झाल्या. त्याचेही नियोजन करावे लागते. माहिती नेमकी जमा करून घ्यावी लागते. बहुतेक वेळा याच कामांत प्रशासनाची बरीचशी शक्ती नाहक खर्च होत असते, परंतु मदत आणि माहिती या दोन्ही पातळींवर शिंदेसाहेब आणि त्यांचा प्रशासकीय वर्ग सारखाच यशस्वी ठरताना दिसला. अपघातात किती लोक दगावले या आकडेवारीत आजच्या मिडीयाला खूपच स्वारस्य दिसते. त्यांना थोडंसं रोखलं की, लगेच मृतांचा आकडा लपवला जातोय, अशी ओरड होते. म्हणून या घटनेच्यावेळी मदतकार्यात अडथळा येऊ नये, अशा पद्धतीने वृत्तवाहिन्या, बातमीदारांना घटनास्थळी त्यांचे काम करू देण्यात आले.

रेल्वे प्रशासन, रेल्वे पोलीस, स्थानिक पोलीस दल, आरोग्य यंत्रणा, वाहतूक विभाग, भारतीय सैन्य दल, मीडिया या सर्वांमध्ये समन्वय राखण्यासाठी एक सुव्यवस्थित प्रशिक्षण झालेलं सक्षम मन असावं लागतं. पुस्तकांतून वाचलेल्या अनेक गोष्टी अशावेळी प्रत्यक्ष अंमलबजावणीत आणाव्या लागतात. The hour throws the man.... असं म्हटलं जातं... अर्थात तो क्षण एक असा सक्षम माणूस निवडतो आणि त्याला लढण्याची प्रेरणा देतो. असंच काहीसं झालं शिंदे साहेबांच्या बाबतीत. क्षणाने अगदी योग्य माणूस निवडला होता. हे दिसून आले! या महाकाय कार्यात दत्तात्रय शिंदे साहेब काही एकटेच नव्हते हे साहजिक असले तरी नेतृत्व म्हणून जो काही गुण असतो, त्याचं महत्त्व असतंच. किंबहुना अचूक आणि तत्काळ निर्णय हे जीवनमरणातील सीमारेषा ठरवत असतात. प्रशासन हा आपल्या या समाजाचा कणा आहे. तो जितका कणखर आणि ताठ तेवढी आपत्तींची तीव्रता कमी. कारण आपत्ती संपूर्णपणे टाळता येत नसतात. त्यांचं निवारण मात्र करता येतं. हेच शिंदे साहेबांनी आणि त्यांच्या बालासोरवासीयांनी दाखवून दिलेले आहे. आपल्यासाठी यातील एक सुखावह बाब म्हणजे हे मराठी रक्त आहे. ओडिशासारख्या दूरच्या राज्यात एक मराठी नाव आपल्या कर्तृत्वाने झळकते आहे, हे आपल्याला अभिमानास्पद असायला हवे. नगर जिल्ह्यातल्या एका छोट्या गावातून येऊन, आपल्या कष्टाच्या जोरावर राष्ट्रीय प्रशासकीय सेवेत प्रवेश करणे आणि प्रसंग पडताच, ज्यासाठी देशाने नेमणूक केली आहे, ते काम धीरोदात्तपणे अमलात

आणणे. याला अद्वितीय धाडस लागते... की जे दत्तात्रय भाऊसाहेब शिंदे यांनी करून दाखवलेले आहे! एका काल्पनिक कथेतील एक पात्र साधारणत: अशा आशयाचं एक वाक्य म्हणतं.... It is not important who I am underneath.... what I do is important! अर्थात मी वरून कसा दिसतो किंवा आतून कसा आहे, यापेक्षा मी प्रत्यक्षात काय कृती करतो, ते सर्वाधिक महत्त्वाचे आहे! श्री. शिंदे साहेबांनी जे काही केलं ते सर्व त्यांच्या कर्तव्याचा एक भाग होते, असे जरी असले तरी हे कर्तव्य करत असताना त्यांनी दाखवलेली समयसूचकता, निर्णयक्षमता अतिशय वाखाणण्याजोगी आहे, यात दुमत असण्याचं काही कारण नाही. कुणी पाहो न पाहो...जग आपल्या कृतींकडे पाहत असते... त्या नजरेस आपण पात्र असलो की, बाकी कशाचं काहीही महत्त्व राहत नाही, हे खरेच. या भयावह प्रसंगात मदतीचा हात पुढे केलेल्या सर्वांना परमेश्वर दीर्घायुरारोग्य देवो, ही प्रार्थना. मराठी मातीने देशाला एक कर्तृत्ववान सेवक दिला आहे, याचा एक मराठी भारतीय म्हणून आपल्यालाही अभिमानच वाटेल. लिहिताना अभिमानाच्या भरात एखाद-दोन बाबी जास्तीच्याही लिहिल्या गेल्या असतील; पण आताच्या जगातील नकारात्मक अन्वयार्थाच्या काळ्या आभाळात दत्तात्रय भाऊसाहेब शिंदे यांच्या त्रिगुणात्मक कार्याचा चंद्रप्रकाश सर्वांनाच सकारात्मक ऊर्जा देऊन जाऊ शकेल असं वाटलं, म्हणून हा लेखनप्रपंच. या लेखाच्या शेवटी वापरलेलं चंद्राचं छायाचित्र बहुदा स्वत: श्री. शिंदे साहेबांनीच काढलेलं असावं...ते त्यांच्या ट्विटर हँडलवर दिसले! लेखातील माहिती अर्थातच विविध माध्यमांतून, बातम्यांतून जशी समजली तशी लिहिली आहे. तपशील प्रत्यक्ष काहीसा वेगळाही असू शकतो... याबद्दल दिलगीर आहे. चला, आपल्या मराठी पोराचं तोंडभरून कौतुक करूयात....वचनं की दरिद्रता?

क्रिकेटमधला सूर्या किती दूरवर षटकार मारतो, त्यापेक्षा हा आपला हा चंद्र किती उंचीवर पोहोचला आहे, याची चर्चा सारा देश करेल... तो सुदिन! सदर रेल्वे दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या जीवांना श्रद्धांजली आणि जखमी असणाऱ्यांना लवकर बरे वाटावे अशी सदिच्छा!

*(लेखास प्रतिसाद म्हणून आपल्या मुलांना या आणि अशा मराठी माणसांबद्दल अधिकाधिक सांगत जाऊ... दुर्घटनांना कसा उत्तम प्रतिसाद दिला जाऊ शकतो, याचाही अभ्यास व्हावा. उत्तम प्रशासन म्हणजेच उत्तम समाज... हे तत्त्व लक्षात ठेवू.)*

**(सेवानिवृत्त आरेखक श्रेणी १, रेखाचित्र शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग.)**

# जीवनदात्री

**अश्विनी राम धावणे**

आपली जीभ नेहमी नियंत्रणात असावी...मग ती खाण्यासाठी असो किंवा बोलण्यासाठी...दोन्हींचा अतिवापर घातकच...

पृथ्वीच्या पाठीवर आपल्यासारखे असंख्य अनंत जीव होऊन गेले आहेत आणि होत आहेत आणि होतील...श्रीरामाचे रामायण, श्रीकृष्णाचे महाभारत पाहून ती आनंदी झाली असेल की, अगणित संहाराने दु:खी/व्याकूळ झाली असेल, असा द्विधा प्रश्न मला पडतो. अनेक अद्वितीय अवतार तिच्या कुशीत उपजलेले पाहून त्यांच्या कर्तृत्वाने ती कृतकृत्य होऊन मनोमन धन्य झाली असेल, तर कधी कुकर्मी अधर्मे पाहून अतीव खिन्नही झाली असेल.

कित्येक जन्म-मरण ती दररोज आपल्या याची डोळा याची देही पाहत असते. ती शांत असते... कित्येक श्रीमंत, कित्येक गरीब, कित्येक बुद्धिमान, कित्येक निर्बुद्ध रुबाब, तर कित्येक याचना ती दररोज आपल्या छाताडावर सहन करीत असेल.असंख्य आले, असंख्य नष्ट झाले; पण ही माऊली तिचे अस्तित्व टिकवून आहे, तिचा मूलाधार टिकवून आहे, तिचं सूर्याभोवती फिरणं नित्याच आहे. तिने तिचा घेतला वसा वर्षानुवर्षे सोडला नाही की तिची रीत मोडली नाही. ती माऊली तग धरून आहे, तिच्यावरील असंख्य जीव वाचवण्यासाठी, जीव जगवण्यासाठी, अनंत जीवांसाठी आपल्या पोटात पाणी साठवण्यासाठी, काळ्या पोटी बीज रुजविते, जीवांचे पोट भरण्यासाठी...

किती प्रेमळ, किती सहनशील, कठोर योगी तर किती निश्चयी आहे ती... तिला गर्व नाही की कसला माज नाही, ती फक्त परोपकारी आहे.

आपण किती शूद्र आहोत तिच्या पुढे... ती मालकीण आहे, ती जीवनदात्री आहे सर्व प्राणीमात्रांची...

हे माझं, ते परक्याचं, याच्यावर विशेष कृपा, त्याच्यावर अन्याय, असा दुजाभाव तिच्यात मुळीच नाही. तिच्या ठायी समत्वभाव आहे सर्व भूतलवासीयांसाठी...

आपण काय करतोय तिच्यासाठी...तिच्याकरिता ऋणभाव तरी आहे का?

जन्माला आलो आणि एक दिवस मरूनही जाणार...कुठे जन्मला, कुठे मरण पावला...१० ते २० आप्तजण, १ दिवस टीव्ही आणि वर्तमानपत्र याखेरीज कोणी दखलही घेणार नाही. युगे-युगे लोटली आणि पुढे लोटतीलही... आपण कधी येथे जन्मलो होतो हे कोणी जाणणार नाही. आपले कर्तृत्त्वच काय आहे, ज्याने युगे-युगे कोणी आपल्याला आठवावं?

माणूस म्हणून साधी माणुसकी तरी जागृत ठेवली आहे का? स्वार्थ, हव्यास, लोभ, गर्व, लबाडी, भांडणे, जात-पात या व्यतिरिक्त अनमोल मानवी जीवनात आपण करत काय आहोत? माणूस प्रगत झाला तो फक्त भौतिक रूपाने... येथे तर पैसाच देव झाला आहे. त्याच्याशिवाय काहीच महत्त्वाचे नाही. माणसाचा जीवही त्याच्यापुढे नगण्य... पैसा प्रसन्न व्हावा म्हणून सर्वकाही करायची टोकाची तयारी... मानवाची आंतरिक सत्यापासून नाळ तुटत चालली आहे, असं वाटत आहे. नैतिकता लोणच्यासारखी तोंडी लावायलासुद्धा राहिली नाही की काय, असा प्रश्न उद्‌भवतोय? तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज अशा इतरही मोठ्या पराक्रमी वीरांची चरित्रे वाचण्याकरिता, आत्मसात करण्याकरिता आपल्या संग्रही जरूर असावीत, जेणेकरून थोडेफार त्यांचे शौर्य, धैर्य आपल्या अंगी मुरविता येईल. जनकल्याणासाठी आपलाही देह कामी यावा ही ईश्वरचरणी साकड्यासह प्रार्थना!

**(पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग.)**

# मुसाफिर हु यारों

**मोनिका भास्करराव गायकवाड**

*हर घडी बदल रही है रूप जिंदगी*
*छाव है कभी, कभी है धूप जिंदगी,*
*हर पल यहां जी भर जियो,*
*जो है समा कल हो ना हो*

'कल हो ना हो' चत्रपटाच्या एका गाण्यात आयुष्याचे किती मोठे सार सांगितले आहे. याच 'हर पल यहा जी भर जीयो' या वाक्याला आयुष्याचा Moto ठरवून मी २०२४ या वर्षाला सुरुवात केली होती. युरोपवारी या माझ्या सर्वांत मोठ्या स्वप्नाच्या पूर्ततेनंतर आता फिरण्याचा आनंद नव्याने मोहवत होता आणि त्याच नादात मी माझे अजून एक स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली, ते होते कंबोडियाचे अंकोरवाट मंदिर, जगातले सर्वात मोठे धार्मिक स्मारक, जे जवळपास ४०० एकरांपेक्षा जास्त मोठ्या जागेवर पसरलेले आहे.

युरोप दौऱ्यामुळे आता visa वगैरेची चिंता नव्हतीच. त्यामुळे पुन्हा एकदा वीणा वर्ल्डच्या लेडीज स्पेशल व्हिएतनाम-कंबोडिया ट्रिपचे बुकिंग केले. व्हिएतनामबद्दल जास्त काय आकर्षण नव्हते; पण कंबोडियासोबत पॅकेजमध्ये व्हिएतनाम पण होताच, तर म्हटले, 'चला हा देश पण बघून घेऊ'. १० दिवसांची ट्रिप, त्यात २ दिवस कंबोडिया अन् ८ दिवस व्हिएतनाम! त्यामुळे थोड्या साशंक मनानेच मी प्रवासाला सुरुवात केली.



१३ डिसेंबरला मुंबईवरून आम्ही हो ची मिन्ह या व्हिएतनामच्या सर्वात मोठ्या शहरात पोहोचलो. व्हिसा ऑन अरायव्हलची प्रोसेस पूर्ण करून लगेच तिथून दुसऱ्या विमानाने 'दा नांग' या शहरात पोहोचलो. एव्हाना connecting flights ची सवय झाली होतीच. त्यामुळे आपल्या आपल्या २-३ बॅग्स् सांभाळत विमानतळाचे हे गेट, ते गेट फिरण्यात थोडा फार सराईतपणा यायला लागला होता, हो चि मिन्ह हे व्हिएतनामचे सर्वांत दक्षिण टोक ते दानांग हे मध्यवर्ती शहर, समुद्राच्या किनाऱ्याला वसलेले मस्त निसर्गरम्य शहर.

तर या शहरात पाऊल टाकताच निसर्गाने आपली करामत दाखवायला सुरुवात केली. भरपूर पावसाला सुरुवात झाली. Precaution म्हणून आम्हाला छत्री किंवा रेनकोट घेऊन या असे आधीच सांगितले होते; पण पुण्याच्या पावसाची सवय असलेली मी, फक्त आपली साधी छत्री घेऊन गेले होते. बऱ्याच जणी पण फक्त छत्र्याच घेऊन आल्या होत्या. हॉटेलच्या बाहेर पडलो, तेव्हा बाहेरच्या जोरात वादळी वाऱ्याने अर्ध्या मिनिटात त्या छत्र्यांनी मान टाकली एवढे जोरात वारे continue सुरू होते आणि पाऊस तर होताच होता. मग आमच्या सर्वांची व्हिएतनाममध्ये सर्वात पहिली shopping झाली ती रेनकोटची. कारण त्याशिवाय कुठेच फिरता आले नसते.

पहिल्या दिवशी संध्याकाळी आम्ही दा नांग शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या ड्रॅगन ब्रीजला भेट दिली. हान नदीवर बांधलेल्या या पुलाच्या कठड्यांना प्रचंड मोठ्या ड्रॅगनचा आकार दिला आहे. रात्री बरोबर ८ वाजता या ड्रॅगनच्या तोंडातून आगीचे लोट बाहेर पडतात. संपूर्ण आकाश प्रकाशमय होऊन जाते. त्यामुळे ते नयनरम्य; पण थोडे प्रदूषणात भर टाकणारे दृश्य बघून आम्ही परत हॉटेलमध्ये आलो.


१४ तारखेला सकाळी लवकरच आम्ही बा ना हिल्स बघायला गेलो. पूर्वी फ्रेंच वसाहत असलेल्या या निसर्गसुंदर डोंगरांवर sun world ने Golden Bridge बांधला आहे. प्रचंड मोठ्या हातांनी तोलून धरलेल्या या ब्रीजवरून खालचा विसर्ग अन् फ्रेंच वसाहत अतिशय मस्त दिसते, परंतु पावसामुळे सगळीकडे ढग खाली उतरून आले होते. केबल कारने वर जातानासुद्धा बाहेर फक्त पांढरे ढंग आणि पाऊसच दिसला. त्या रोरावत्या पाऊस वाऱ्यातसुद्धा आम्ही ५-६ जणींनी बाहेर गोल्डन ब्रीजवर जाऊन फोटो काढलाच, तिथे जाऊन आल्याचा proof नको का? त्या पावसातच आम्ही परत खाली आले अन् wax museum बघून पुन्हा दांनाग शहरात आलो, ट्रीपचा technically पहिला दिवस पावसाच्या नावे गेला.

१५ डिसेंबरला Hoi an या जागतिक वारसा स्थळांत समाविष्ट शहरात आम्ही गेलो. जुने व्हिएतनाम शहर पाहिले, of course पावसातच. नंतर Basket Boat ride साठी Cam Thanh Coconut village मध्ये गेलो. हम्पीला आहे तशी coracle ride सारखी ही छोटी गोल होडी तुम्हाला नारळांच्या मोठ्या बागेतून फिरवून आणते. इथली नारळाची झाडे पाण्याखाली उगवतात आणि पाण्यातच नारळ पण येतात. त्यामुळे होडीतून नारळाची बाग बघणे ही कधी काळी विचारही न केलेली गोष्ट आम्ही करून आलो.

संध्याकाळी Lantern Boat ride होती. एका छोट्याशा होडीला खूप सारे कंदील बांधलेले आणि पाण्यातून त्या सुंदर दिव्यांचे प्रतिबिंब

बघत काही अंतर पार केले. निसर्ग आणि मानव एकोप्याने, परस्परपूरक कसे जगू शकतात हे गेल्या २..३ दिवसांत आम्ही अनुभवत होतो.

चौथा दिवस होता व्हिएतनामची राजधानी Hanoi शहराला भेट देण्याचा. अमेरिका-व्हिएतनाम युद्धामध्ये व्हिएतनामने बलाढ्य अमेरिकाला गनिमीकाव्याने युद्ध करून हरवले. त्या वेळी व्हिएतनामचे नेतृत्व करणाऱ्या हो चि मिन्ह यांचे मोठे स्मारक पाहिले. Temple of Literature म्हणजेच कन्फुशिअस या महान तत्त्वेवत्त्याचे स्मारक आहे. १०७० मध्ये बांधलेले हे मंदिर म्हणजे व्हिएतनाम मधली पहिली university आहे. Imperial academy म्हणून १०७६ ते १७७९ पर्यंत या ठिकाणाचा वापर झाला. ते बघताना आपले नालंदा विद्यापीठ पण असेच असेल का अशा प्रश्न डोक्यात आला. संध्याकाळी तिथला प्रसिद्ध पारंपरिक Musical water puppet show बघून परत आलो.



ट्रीपचा पाचवा दिवस माझ्यासाठी प्रचंड अविस्मरणीय ठरला, ते Halong Bay च्या cruise ride मुळे. प्रचंड मोठा नितळ समुद्र, मध्ये-मध्ये डोकावणारे चुनखडकांचे डोंगर आणि त्या सर्वांमधून हळूहळू मार्गक्रमण करणारी आमची मस्त मोठी ३ मजली cruise. cruise मध्ये केलेला हा माझा पहिलाच प्रवास. नशिबाने मिळालेली तिसऱ्या मजल्यावरची सर्वांत मोठी प्रशस्त रूम, त्याच्या बाल्कनीमध्ये बसून संध्याकाळचे सुंदर वारे आणि नंतर cruise च्या top वर जाऊन अनुभवलेला सूर्यास्त, सगळेच कल्पनेच्या पलीकडचे होते. पुढची ट्रीप करण्याऐवजी इथेच अजून ४ दिवस घालवावेत, असे आम्हाला सर्वांनाच वाटू लागले होते. रात्रीच्या अंधारात त्या विस्तीर्ण समुद्रात नांगरलेली आमची बोट, थोडीफार बाकीच्या बोटीची रोशणाई आणि समुद्राची, डोंगरांची मिळून बनलेली एक गूढ रम्य शांतता. कदाचित समाधी अवस्था यालाच म्हणत असतील. खूप-खूप मानसिक समाधानाची शिदोरी घेऊन दुसऱ्या दिवशी आम्ही वाटचाल केली माझ्या Dream destination Siem Reap शहराकडे.

कंबोडिया मधल्या या हिंदू-बौद्ध मंदिर संकुलाची बांधणी ११५० मध्ये विष्णु मंदिर म्हणून झाली होती. प्राचीन खेमर साम्राजाची राजधानी असलेले अंगकोर हे शहर नंतर हळूहळू बौद्ध मंदिर बनले. संपूर्ण मंदिराच्या भिंतीवर हिंदू पुराणकथा, मेरु पर्वत, अमृत मंथन, रामायण आणि महाभारत यातील अनेक प्रसंग कोरलेले आहेत. विष्णूची मूर्ती, हिंदू धर्माची चिन्हे आणि बौद्ध धर्मातील काही प्रसंग, मूर्त्या असे भिन्न, परंतु एकसंध वाटणारे हे मंदिर, त्यातील विविध स्थापत्यशैलीचे आविष्कार बघून मन प्रचंड स्तिमित झाले. त्याच मंदिर संकुलामधील बयान मंदिर, जे वडाच्या आणि पिंपळाच्या प्राचीन झाडांभोवती बांधलेले आहे, ते देखील पाहिले. आपला भारत देश या संपूर्ण मंदिर संकुलाच्या पुर्नबांधणीसाठी आणि जतन करण्यासाठी भारतीय पुरातत्त्व विभागामार्फत मदत करत आहे हे बघून खूप छान वाटले. त्या मंत्रमुग्ध अवस्थेतच आम्ही कंबोडियाचा निरोप घेऊन पुन्हा एकदा व्हिएतनाममध्ये आलो. ट्रीपचा हा आठवा दिवस होता जगप्रसिद्ध Cu chi Tunnels ला भेट देण्याचा. अमेरिकेला नामोहरम करण्यासाठी व्हिएतनामने जे गनिमी युद्ध लढले ते या tunnels चा वापर करून जमिनीखाली भुयारे बनवून तिथे युद्धशाला, दवाखाने, विश्रामगृहे, असे सर्वच या भुयारांमध्ये सोय केलेली आहे. शत्रू चुकून आत आला, तर शिताफीने त्याला अडकवून दुसऱ्या भुयारातून बाहेर पडायचे. असे जवळजवळ २०० किलोमीटर परिसरात interlink भुयारांचे जाळे पसरवलेले होते व्हिएतनामी लोकांनी. त्यांची कल्पकता, चिकाटी, अदम्य सहनशक्ती आणि हिमतीला सलामी देऊन आम्ही Cu Chi Tunnels चा निरोप घेतला.

नंतर मेकांग नदीच्या त्रिभुज प्रदेशात पसरलेल्या Phoenix बेटावर गेलो. Coconut Candy factory पाहिली. कालव्यांमधून बोट राईड केली. दुपारच्या उन्हातसुद्धा नारळांच्या झाडांच्या सावलीमुळे बोटीतून प्रवास करताना ऊन सावलीचा खेळ बघता आला.

बघता-बघता ट्रीपचा शेवटचा दिवस उजाडला, आज बघायचे होते hmo Ho Chi Minh शहरामधले War Crime Museum. अमेरिका-व्हिएतनाम युद्धात वापरलेली विमाने, रणगाडे, बॉम्ब, बंदुका यांचे ते संग्रहालय होतेच; पण युद्धात देशाला किती झळ पोचली, याचा चित्रमय इतिहास तिथे मांडलेला आहे. १९५४ ते १९७५ या काळात जगात बलाढ्य असलेल्या अमेरिकेने व्हिएतनामसारख्या छोट्या देशाला शीतयुद्धात ओढून तिथले जनजीवन विस्कळित केले. Agent Orange नावाच्या विषारी रसायन संपूर्ण व्हिएतनाममध्ये अमेरिका air force ने फवारले. त्यामुळे आजही व्हिएतनामी लोकांच्या अनेक पिढ्या अपंग जन्माला येत आहेत. सुंदर, निसर्गाचे भरपूर दान मिळालेल्या व्हिएतनमाला माणसांच्या लालसेपायी किती विध्वंस सहन करावा लागला ते बघून मन खूप हेलावून गेले.


ट्रीप संपली ती आनंद आणि दुःख यांचा मिलाफ घेऊनच. माणूस मनात आणले तर किती सुंदर जग बनवू शकतो आणि हव्यासामुळे जगाची किती वाताहत करू शकतो, हे दोन्ही पाहून आम्ही पुन्हा मुंबईच्या दिशेने मार्गक्रमण केले.

*क्युकी हमे चलते जाना हैं । बस चलते जाना ।।*

**(राज्यकर निरीक्षक,मा. राज्यकर सह आयुक्त ३, पुणे यांचे कार्यालय.)**

# देवनागरी सुलेखन भाग–६


## सुलेखनाची रंगसंगतीसह काही उदाहरणे...












(सुलेखनकार : अजय भोसले, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.)



# कविता

## चंद्रग्रहण

कोजागिरीचा असला चंद्र तू...
तुझे उगवणे नवखे नाही...
रोज आला तुकड्यांनी...
तरी अजून तू संपूर्ण नाही...
तुझ्या ललाटी असेल तेज...
तरी गाली डाग लपणार नाही...
रोजचं तुझं असणं..सवयीचं नाही...
पौर्णिमेचा चंद्र तू...
अमावास्याला हजर नाही...



**– किरण श्रीपती सुळ**
सहायक कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग.

## वेळ असते हातात तेव्हा...

वेळ असते हातात तेव्हाच,
आपल्या माणसांना जवळ घ्यावं,
काय हवं, काय नको ते प्रेमाने विचारावं.
दिवस सरतो, रात्र सरते वाढत जातो दुरावा,
कामाचा ताण असताना दूर जातो जीवनातील ऋतू हिरवा,
वेळीच सावध होऊन, योग्य काय ते ठरवा.
म्हणूनच वेळ असते हातात तेव्हाच...

प्रत्येक क्षण मोलाचा तो प्रेमाने सजवा,
जेव्हा गरज असते आपली त्यांना,
तेव्हा वेळ आपला त्यांना द्यावा.
जगाला आपल्या प्रेमाचा वाटू द्यावा हेवा,
एकदा वेळ निघून गेली की परत मिळत नाही
आपल्या प्रेमळ माणसाचा ठेवा.
म्हणूनच वेळ असते हातात तेव्हाच...

वाद झाला तरी संवाद सुरू ठेवा,
कधी मोठेपणा घेत स्वतःच माघार घ्यावा.
आभासी या जगात क्षणभर स्क्रीनवर दिसावं ,
पण जगावं असं की सर्वांना हवहवसं व्हावं .
म्हणूनच वेळ असते हातात तेव्हाच...



**– सारिका नि. चौधरी**
सहायक कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग.

## सारे तसेच राहिले...

हे करायचे ते करायचे, नियोजन सारे असेच राहीले
बोलता बोलता थांबली तू,बोलणे सारे तसेच राहिले

असे ओढून ताणून कोणी कोणास का घेऊन जावे
शेवटच्या श्वासापर्यंतचा संघर्ष,जगणे तसेच राहिले

अदमास नव्हता मृत्यूचा ना शंका आली त्याची कधी
चोरपावलाने आला तो अंदाज बांधणे तसेच राहिले

प्रस्तावनेशिवाय सादरीकरणाची सवय तुझी जुनी
तू काढता का पाय घेतला स्पष्टीकरण तसेच राहिले

तुझी गुपिते किश्श्यांची जरी आयुष्य असे आलमारी
'सोलमेट 'भेटला का तुझा,उत्तर अधुरे तसेच राहिले

आमच्या मैत्री दोस्तीचा कित्येकांना होता यक्ष प्रश्न
तेही उसासले आपुलकीने खुलासे सारे तसेच राहिले

कित्येक आठवणी उरात आणि संदर्भ सारे मनात
मैफिल अर्ध्यावर का सोडली विचारणे तसेच राहिले


**– प्रवीण टाके,**
**उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर.**

# स्पर्श : कविता संग्रह





**अजय भोसले**

दीपक शेडगे लिखित स्पर्श संग्रह कविता अलिकडे वाचनात आला. दीपक शेडगे हे जाहिरात, कला, जनसंपर्क क्षेत्रातील व प्रकाशन क्षेत्रातील बहुढंगी व्यक्तिमत्त्व आहे. खरंतर मी कमल शेडगे, सुलेखनकार यांच्या एका पुस्तकाच्या शोधात होतो आणि त्यांचे बंधु दीपक शेडगे यांची भेट झाली. स्पर्श हा कविता संग्रह कविता आणि सुलेखन याचा सुंदर मिलाप आहे. प्रत्येक कवितेचे शीर्षक कमल शेडगे यांनी प्रभावीपणे सुलेखनाच्या माध्यमातून सादर केले आहे. पाहता क्षणीच उत्सुकता निर्माण होत असल्याने कविता संग्रह एका बैठकीत वाचून काढला. चित्र, वर्तूळ, क्षितीजे, रस्ता, साद अशा वेगवेगळ्या पटलावर कविता आपल्याला फिरवत असते. त्या कवितेला नादमयता प्राप्त करून देते कमल शेडगे यांचे सुलेखन.










'मी कविता का लिहितो?' यावर दीपक शेडगे म्हणतात,

या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा मी जेव्हा-जेव्हा प्रयत्न केला, तेव्हा-तेव्हा मला जाणवलं की, कवितेच्या माध्यमातून मी स्वतःचाच शोध घेत असतो. आजूबाजूच्या सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीचा, सभोवतालच्या निसर्गाचा आणि माणसांच्या जगण्याचा अर्थ शोधण्याचा मी कवितेतून प्रयत्न करतो. कवितेच्या माध्यमातून स्वतःलाच खोदत जाताना स्वतःच्या आणि आजूबाजूच्या माणसांच्या अस्तित्वाचा मी शोध घेत असतो.

तर कमल शेडगे म्हणतात,

एके दिवशी डोक्यात वीज चमकून गेली. या रूढीतील कंपोझिंगमध्ये टाइप न करता ती निरनिराळ्या अक्षरलेखन शैलीत, त्या त्या कवितेला शोभतील अशी केली तर ! 'स्पर्श'मधल्या कविता साचेबंद, पारंपरिक कवितांपेक्षा वेगळ्याच, भेदक तरीही वेधक असल्यानं पुस्तकाच्या सजावटीत मी काळ्या व ग्रे रंगाचा वापर अधिक केला.

दीपक शेडगे यांच्या कवितेतून भावनांचे वेगवेगळे पदर हळूवार उलगडत जातात, तर कमल शेडगे यांच्या सुलेखनातून ते मनाच्या पटलावर कोरले जातात. हा कविता संग्रह इतर कविता संग्रहापेक्षा वेगळा असल्याने सर्वांनी जरूर वाचावा.

**(अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन.)**

**चंद्रशेखर पालव**

आपल्या देशामध्ये बाबांचा बोलबाला आहे. काहींचे हजारो-लाखो भक्त आहेत, काही जेलची हवा खात आहेत. सच्चा झुठा साबित झाला आहे. तरीही डेरा टाकून काही बाबा 'निर्मल' होऊन टीव्हीवर भक्तांना उल्लू बनवत आहेत. बाबा लोकांच्या या गर्दीत आमच्या विदर्भात एक भाऊ आहेत. या भाऊंच्या अंगठ्याचे पाणी जरी प्यायले तरी सुधारतील. अंगठ्याचे पाणी म्हणजे त्यांनी भाऊंपासून थोडा बोध



घेतला तरी बरे होईल. (नाहीतर अंधश्रद्धावाले अंगठ्याच्या पाण्यावरून भडकायचे.) हे भाऊ आहेत, शिवशंकर भाऊ पाटील. बुलडाणा या विदर्भातील जिल्ह्यात असलेल्या शेगावमधील सुप्रसिद्ध श्री गजानन महाराज संस्थानचे ते प्रमुख आहेत. राज्य पत्रकार अधिस्वीकृती समितीच्या बैठकीच्या निमित्ताने समितीचे सदस्य त्यांना भेटले. त्या भेटीत या कर्मयोग्याने जे काही सांगितले, त्याने सगळेच अक्षरशः भारावून गेले.

शिवशंकर भाऊंचे वय अवघे ७७ वर्षे. चेहऱ्यावर सुरकत्या असल्या तरी प्रदीर्घकाळ केलेल्या सत्कार्याच्या समाधानाचे तेज त्या सुरकत्यांमधून सकाळच्या कोवळ्या; पण ऊबदार सूर्यकिरणांसारखे पसरत असते. बोलताना क्षणाक्षणाला ते भावनिक होतात, लगेच डोळ्याच्या कडा पाणावतात. मग ते स्वतःच काहीतरी मिश्किल बोलून वातावरण हलकंफुलकं करतात. 'भाऊ पद्मश्री, पद्मभूषण तुम्हाला सरकारनं देऊ केले; पण तुम्ही ते नम्रपणे नाकारले, असं का? त्यावर भाऊंचे उत्तर हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही. ते सांगतात, 'अहो! माझे हात माऊलींच्या (श्री गजानन महाराजांच्या) चरणांवर असतात, उद्या पुरस्कार घ्यायला गेलो, तर माऊलींच्या चरणांवरील हात हटतील ना माझे! ते कधीही हटू नयेत, अशी माझी मनोमन इच्छा आहे, म्हणून मी कुठलाही पुरस्कार नाकारतो.

शेगावच्या अवाढव्य संस्थानचा कारभार १०० टक्के पारदर्शक असा आहे. स्वतः भाऊ संस्थानमधील पाणीही पित नाहीत. जेवणाचा डबा घरून आणतात. आज संस्थानमध्ये तब्बल ११ हजार सेवेकरी आहेत. एकही पैसा मानधन न घेता ते काम करतात. त्यात आबालवृद्ध, गावखेड्यातील मुला-माणसांपासून नोकरदार, बड्या कंपन्यांमधील अधिकारीही असतात. तीन हजार सेवेकरी सेवेची संधी मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत. या सेवेकऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांना नेमून दिलेलं काम ते नेटानं करतात. उगाच दुसरीकडे लुडबूड करीत नाहीत. भक्तनिवास परिसरातील झाडांची पाने उचलण्याचे काम नेमून दिलेला सेवेकरी पान झाडावरून खाली पडण्याच्या आतच झेलतो, असे शिवशंकरभाऊ कौतुकमिश्रित नजरेने सांगतात. या सेवेकऱ्यांच्या राहण्याजेवण्याची व्यवस्था, आरोग्याची काळजी संस्थान करते.

दहा सेवेकऱ्यांपासून या अभिनव संकल्पनेला सुरुवात झाली ती ऐंशीच्या दशकात. आजूबाजूच्या खेड्यातून आलेले दहा सेवेकरी सायंकाळी संस्थानमध्ये जमले. त्यांच्या राहण्याची व्यवस्था होती, त्या खोलीत जाऊन शिवशंकर भाऊंनी डोकावले, तर त्यांना धक्काच बसला. लाल मिलो ज्वारीच्या भाकरीवर मीठ, पाणी टाकून ते खात होते. भाऊंनी विचारलं, अरे बाबा! तुम्ही सेवेकरी म्हणून आले आहात, तर संस्थानमध्ये तुमच्या जेवणाची व्यवस्था करणारच आहोत ना! त्यावर, ते सेवेकरी म्हणाले, 'भाऊ! आम्ही सेवेकऱ्याचे काम उद्यापासून सुरू करणार आहोत, मग आज आम्ही संस्थानमधील जेवण कसे जेवणार? त्याचक्षणी भाऊंनी निर्णय घेतला, आजपासून संस्थानमधील पाणीही ते पिणार नाहीत. वर्षभरातील तीन महाप्रसाद सोडले तर भाऊंनी ते व्रत आजही तंतोतंत पाळलं आहे. इतर ट्रस्टींनी त्यांचं अनुकरण केलंय.

# बाबांच्या गर्दीतील भाऊ!

मंदिरात कमालीची शिस्त, स्वच्छता, पावित्र्य जपले आहे. 'भक्तांचा हात धरून त्यांना माऊलींच्या चरणी पैसे टाकण्याची जबरदस्ती करणाऱ्या बडव्यांना इथे स्थान नाही.' ते सगळे चंद्रभागेच्या तिरी. हजारो भक्तांची निवासाची सोय करणाऱ्या भक्तनिवासांमधील टापटीप वाखाणण्यासारखी आहे. संस्थानमार्फत एक-दोन नाही, तर तब्बल ४२ सेवा प्रकल्प चालविले जातात. बुलडाणा जिल्ह्यातील हजारो लोकांना मोफत आरोग्य सेवा गावोगावी दिली जाते. आबालवृद्धांच्या मनोरंजनाबरोबरच त्यांना आध्यात्माची शिकवण देणारा आनंदसागर हा अनोखा पार्क ही शिवशंकर भाऊंच्या कर्तृत्वाची आणखी एक देणं. समाजाला केवळ बोधामृत पाजण्याऐवजी कर्मयोगाचे उदाहरण घालून दिलेला हा तपस्वी आहे. शेगावच्या आधी वा नंतर ज्या संस्थानांचे नाव घेतले जाते, त्याचे अध्यक्ष मध्यंतरी भाऊंच्या भेटीला आले; काही मार्गदर्शन करा म्हणाले. भाऊ एवढेच म्हणाले, 'आमच्या संस्थानचे बजेट १५० कोटींचे आहे. तुमच्या संस्थानची तूप खरेदीच ३०० कोटींची आहे, असं मी ऐकतो, असे खर्च कमी करा... बाकी काय सांगू'.

श्री गजानन महाराज संस्थानच्या सेवेचा हा पॅटर्न सगळ्या संस्थानांनी स्वीकारला, तर सेवाकार्याचे एक मनोहारी विश्व तयार होईल, यात शंका नाहीच..

**(निवृत्त आरेखन श्रेणी १, लेखाचित्र शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग.)**

# गणूचं प्रजासत्ताक!

**किरण म. शार्दूल**

चाळीतली वस्ती. सर्वच जन कामगार. सर्वांची कुटुंबेदेखील मोठीच. किंबहुना छोटे कुटुंब, सुखी कुटुंब ही संकल्पनाच त्याकाळी फारशी अस्तित्वात आली नव्हती. प्रत्येक घरात किमान चार/पाच लेकर, एखाद दुसरं म्हातारं माणूस असायंचंच. कामाचा गडी कामावर जायचा आणि बायकांचा सर्व पोरांच व वृद्धांच आवरता–सावरता वेळ जावून सांज होत असे आणि दिवे लागणीची वेळस घरधनी कामाहून येईल, म्हणून सांजच्या स्वयंपाकाला सुरुवात होत असे. बाई माणसाला तशी फुरसत नव्हतीच.

गणूचं कुटुंबही त्यातीलच एक. घरात चिल्ली–पिल्ली मिळून सहा भावंडे, दोन बहिणी मोठ्या, गणू तीन नंबर, चौथी पुन्हा बहीण, पाच आणि सहा नंबरला पुन्हा लहानभाऊ, मोठ्या बहिणी अनुक्रमे सातवी व नववीला. गणूने नुकतेच प्राथमिक शिक्षण पूर्ण करून पाचवीसाठीचा प्रवेश पुढील शाळेत घेतला होता. कामगार वस्तीत सरकारी जिल्हा परिषदेची/ नगरपालिकेची शाळा नव्हती. खासगी शाळा काही थोडी फार फी घेत होती. तीच कशी बशी भरून या मोठ्या कुटुंबात गणुचे शिक्षण सुरू झाले होते.

गणूच्या वडिलांच्या तुटपुंज्या पगारात काटकसरीत दिवस पुढे जात होते. मुलांना शाळेसाठी पूर्ण वर्षाला एकच ड्रेस. एक ड्रेस वाढ दिवसाला व एक ड्रेस १४ एप्रिल अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीला. गणूची शाळा सुरू झाली. गणूच्या वडिलांनी काटकसरीतून बचत केलेल्या पैशात शाळेचा एकमेव नविन ड्रेस खरेदी केला होता. सफेद शर्ट, खाकी हाफ पँट. शालेय ड्रेस व्यतिरिक्त दुसरा ड्रेस आता त्याच्या वाढदिवसाला म्हणजेच डिसेंबरमध्ये मिळणार होता. अर्थात ईतर वेळेस शॉर्टपँट व बनियन यावरच काम भागून जात असे. शाळा दुपारची १२ ते ५.३० अशी. शाळेचा एकच ड्रेस सोमवार ते शनिवार घालायचा. शनिवारी शाळा सकाळची असायची. शनिवारी अर्धादिवस शाळा भरायची, सकाळी ७ ते १० तरी ड्रेस मात्र पूर्ण दिवस अंगावर असायचा. रविवारी शाळेचा ड्रेस धुवायचा. सोमवारी पुन्हा पुढील आठवड्यासाठी वापर सुरू. असा क्रम ठरलेला.

शाळेचे पहिले सत्र संपले. दिवाळी होऊन नोव्हेंबरच्या मध्यावर पुन्हा शाळा सुरू झाली. पुढील डिसेंबर महिन्याचे अखेरीस गणुचा वाढदिवस आलेला. लहान मुलांचे वाढदिवस म्हणजे आता सारखे फॅड/फाजील लाड नाहीच. कसलाही गाजावाजा नाही. आजूबाजूला देखिल कळायचे नाही. तसेच ज्याचा वाढदिवस त्यालाही त्याचा वाढ दिवस इतरांनी साजरा करावा किंवा वाढदिवस हा वेगळा विशेष दिवस असतो, असे काहीही तो समजत नसे. साधासुधा आई–वडिलांना परवडेल असा घेतला, तर घेतला नवीन ड्रेस, खायला गोड शिरा आणि तव्यावर थेंब थेंब तेल टाकून केलेली गोल भजी एव्हढंच! किंवा या पैकी कोणतेही एक केल तरी खुप झालं!

गणूच्या वडिलांनी बचत करून गणूच्या वाढदिवसासाठी नवीन ड्रेस घेण्याची तरतुद केलेली होतीच. डिसेंबर अर्धा उलटला. गणूला वाढदिवसाचे नाही; पण नवीन ड्रेस मिळणार, याची आस लागली होती. शाळेत हिवाळी स्पर्धा सुरू झाल्या होत्या. डिसेंबर महिन्यातील अखेरचा आठवडा. अंतर्गत स्पर्धा पूर्ण होऊन मैदानी स्पर्धा सुरू झाल्या. रनिंग झाली, कब्बड्डी झाली. खो–खो झाली, आता लांब उडीची स्पर्धा होती. शाळेच्या सर्व इयत्तेच्या सर्वच मुलांना स्पर्धेत भाग घेण्याची सक्ती होती. गणूनेही सर्व स्पर्धेत भाग घेतलाच होता; पण कोणतीही स्पर्धा जिंकली नव्हती. आता शेवटची लांब उडीची स्पर्धा होती. आखून दिलेल्या सीमारेषेवरून जोरात पळत–पळत येऊन वाळूत लांब उडी मारायची. स्पर्धा सुरू झाली. जितका जोरात पळणार तितकी लांब उडी जाणार, हे समीकरण गणूने मनाशी जुवळवलेले. त्यातुनच तो जीवाचे आंकांताने पळत सुटला आणि बरोबर वाळूच्या खडयात जोरात लांब उडी मारली व उडी मारलेल्या ठिकाणपासून तसाच काही फुट पुढे फरफटत गेला. सोबत असलेल्या सर्व मुलांचे तुलनेत त्याची उडी लांब असल्याने नोंद घेणाऱ्या शिक्षकाने तत्काळ पुढे होत त्याला पकडले, उठवून उभे केले. तो पहिला आल्याने त्याचे नाव टिपूण घेतले.



गणू खुश झाला होता. आता २६ जानेवारी प्रजासत्ताकदिनी त्यालाही बक्षिस मिळणार होतं. त्या खुशीतच स्वारी होती. शाळेतील इतर मुले मात्र हसत होती. ते त्याच्या लक्षात आले. लांब उडी मारल्याने बहुदा पँटला वाळू/माती/कचरा लागला असेल म्हणून त्यांन पँट मागच्या बाजूला न पाहताच दोन्ही हातानी झटकली. धुळ, माती, कचरा तर झटकला गेलाच; पण असे करतानाच दोन बोटे कपड्यातून आत गेली व आतील अंगाला स्पर्श झाल्याचे त्याच्या तत्काळ लक्षात आले. शाळेची एकमेव खाकी पँट, शीटवरच फाटली होती! आता अवसान गळाले. पुढील ६ महिने अशी फाटकी घालावी लागणार होती. तसाच घरी गेला. आपल्याच हाताने सुई दोऱ्याने पँट शिवून काढली.

दोन दिवसांनी गणूचा वाढदिवस होता. गणुच्या वडिलांनी काटकसर करून अगोदरच ड्रेस आणून ठेवला होता; पण गणूला कळू दिले नव्हते, तर वडिलांवर अधिक बोझा नको, म्हणून पँट फाटल्याचे गणूनेही वडिलांना कळू दिले नव्हते. शाळेत वाढदिवस साजरा करण्याची पद्धत नव्हतीच. त्यामुळे कोणाचा वाढदिवस कधी हे कोणी सांगतही नसे व कोणला कळतही नसे. त्यानुसार वाढदिवसाचे

दिवशीही गणू ती टाका घातलेली पँट घालूनच शाळेत गेला. लाजायचे काही कारण नव्हते. इतरही मुलेही गरिबीतीलच होती. सायंकाळी घरी येताच गणूला वडील लवकर आल्याचे समजले. मोठ्या ताईने त्याचे हातावर ड्रेस टेकवला. तो खुश होईल असे वाटले; पण खुश झाला नाही. दोन्ही हात खाकी पँटचे मागे नेऊन काही लपवत असल्याचे त्याचे आईला व ताईला समजले. बळेच त्याला पकडून उलट्या बाजूने वळते केले. शीटवर फाटलेली व ओबड-धोबड शिवलेली पँट संगळयांना दिसली. गणुने आईला सांगितले, मला नवीन ड्रेस नको. शाळेचा नवीन ड्रेस पाहिजे. आणू बाळा, हा ड्रेस बदलून शाळेचा नवीन ड्रेस आणू, असे म्हणून त्यावेळी समजूत काढण्यात आली.



वाढदिवसाचा दिवस तसाच निघून गेला. डिसेंबर महिनाही संपुर्ण गेला. ड्रेस काही बदलून आला नव्हता. आठवड्याचे मीना बाजारातून आणलेला तो ड्रेस, शाळा सुरू होण्याचे दिवस नसताना आठवडे बाजारात शालेय ड्रेस कसा उपलब्ध होणार? अशा वेळी शालेय ड्रेस घ्यायचा म्हणजे शहरात जाऊन दुकानातून खरेदी करायचा. गणुच्या वडिलांनी आठवडे बाजारात जावून तो ड्रेस परत केला. आठवडे बाजारातील दुकानदार प्रामाणिक त्याने ड्रेसचे पैसे परत केले. हाती असलेले पैसे व दुकानातील ड्रेसची किंमत काही मेळ जूळत नव्हता. अधिकचे पैस घालावे लागणार होते. शहरातील दुकानदार उरलेले पैसे उसणे ठेवायला तयार नव्हता. त्यामुळे ड्रेस खरेदी आपोआपच लांबणीवर पडले.

गणुची शाळा टाका घातलेल्या पँटवरच पुन्हा-पुन्हा टाका घालून चालू होती. आपल्या घराची दुकानातून महागडा नवीन ड्रेस घेण्याची परिस्थिती नाही, हे गणूला ठावूक होते. त्यामुळे तोही काही हट्ट करत नव्हता. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन जवळ आला होता. प्रजासत्ताकदिनी बक्षिसे दिली जाणाऱ्या मुलांची नावे पुन्हा एकदा २४ जानेवारीला वाचून दाखवण्यात आली व सर्वांनी २६ जानेवारीला स्वच्छ गणवेशात येण्याची सूचना देण्यात आली. गणू घरी आला. आईला शाळेची सूचना सांगितली. नविन ड्रेस नाही; पण पँट तरी नवीन पाहिजे म्हणून आईला सांगितले. ड्रेसचे पैसेही खर्च झाले, म्हणून आईने त्यास सांगितले. गणुलाही वाटले झाले असतील खर्च, म्हणून त्याचीही काही प्रतिक्रिया आली नाही. २५ तारखेला शाळेतून घरी येताच स्वतःच ड्रेस धुतला. रात्रभर वाळवला. सकाळी पितळी तांब्यात चुलीचा विस्तव भरला आणि सफेद शर्ट व फाटक्या पँटीला तांब्याने इस्त्री करून ७ वाजेच्या प्रजासत्ताकदिनाचे झेंडा वंदनासाठी बक्षिस घेण्यासाठी तयार झाला.

गणुच्या घरातील सर्व मंडळी पाहत होती. मोठ्या बहिणीही झेंडा वंदनासाठी निघाल्या होत्या. गणुला बक्षिस मिळणार होते. गणू आई-वडिलांचे आशीर्वाद घेण्यासाठी गेला. आईचा आर्शीवाद घेण्यासाठी खाली वाकला. पाठीला आईचा स्पर्श न होता वेगळाच स्पर्श झाला होता. झटकन सरळ उभा राहिला. आईने नवीन शाळेचा ड्रेस त्याच्या हातात टेकवला. वडिलांनी गणूची पाठ थोपटली. तिघांचेही डोळ्यात आनंदाश्रु होते. गणुने उडीच मारली. सर्व कुटूंब आणंदी झाले होते. कुटूंब जरी मोठे होते तरी त्यात विचाराचे स्वातंत्र्य होते. वागण्यात समता आणि बंधूभाव होता. झेंडा वंदन पश्चात झालेल्या शाळेच्या सत्कार सोहळ्यात गणुला त्याचा नविन ड्रेस पाहून लांब उडीसाठी दिलेले बक्षिस पहिले पुकारण्यात आले.

गणुच्या वडिलांनी रोजच्या तुलनेत जास्तीचे काम करून अधिकचे पैसे जमवून शेवटी शहरातील दुकानातून गणूचा शालेय ड्रेस खरेदी केला होता. गणू संयमाची परीक्षा उत्तीर्ण झाला होता. परिस्थितीची त्याला जाणीव होती. गणुच्या वडिलांनी ठरविल्यानुसार यापुढे वाढदिवस होणार नव्हता. फक्त तीनच सण साजरे होणार होते. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आणि १४ एप्रिल. गणूला वर्षाला दोन शाळेचे ड्रेस एक शैक्षणिक वर्षाचे सुरुवातीस, तर दुसरा २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी मिळणार होता, तर शालेय ड्रेस व्यतिरिक्त ड्रेस १४ एप्रिल म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला मिळणार होता. गणू बक्षिस घेऊन धावतच घरी आला. एका हातात तिरंगा होता, तर दुसऱ्या हातात बक्षीस! सर्वांचे समोरच चकाकणारे कागदी आवरणाचे बक्षीस उघडून तलम रेशमी वस्त्र गुंडाळलेले सन्मानाने जगण्याचे पुस्तक बाहेर आले. पुस्तकाचे नाव होते, भारतीय संविधान!

**(कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग.)**

**महेश पगार**

दैनंदिन कामाच्या दगदगरूपी विकारातून बाहेर पडावे, म्हणून मनोरंजनाची औषधे शोधण्यासाठी दुरचित्रवाणी चालू केली, तोच पहिला कार्यक्रम बातम्यांचा. एकाच विषयावर बातमी केंद्रित झालेली होती. तो विषय म्हणजे स्थलांतर. वेगवेगळे चॅनेल बदलले तरी फक्त भाषा सोडून काहीही बदलत नव्हते. मग मन शेवटी स्थलांतर या विषयावरच येऊन थांबले. मग विचार केला, स्थलांतर म्हणजे काय?

# स्थलांतर : वस्तुस्थितीचे अवलोकन



थोडक्यात सांगायचे तर एका प्रदेशात असलेल्या प्रतिकूल परिस्थितीतून दुसऱ्या प्रदेशातील जीवनावश्यक अशा अनुकूल स्थितीत मार्गक्रमण करणे म्हणजे स्थलांतर होय. स्थलांतर हे मनुष्याच्या बाबतीतच होते असे नाही, तर इतर प्राणी जमातीतही हा प्रश्न अनुभवयास मिळतो. माणसानं भूपृष्ठावर रेघा मारण्यास सुरुवात केली आणि स्थलांतर या संकल्पनेचा उदय झाला. विविध प्रकारची बंधने तोडून स्वतंत्र श्वास घेण्याची माणसांची जी ओढ असते, तीच स्थलांतर करण्यास प्रोत्साहन देते; पण हे शत-प्रतिशत खरेही नाही. कधी-कधी स्थलांतर हे ऐच्छिक असते. उदा.- चांगले शिक्षण घेऊन चांगल्या पगाराची नोकरी मिळावी, यासाठी भारतातून अनेक विद्यार्थी अमेरिका, ऑस्ट्रेलिया इ. देशांची वाट धरतात. याउलट काही वेळा तत्कालीन राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती इतकी असते की, स्थलांतर करणे भाग असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे वाढणारे लोंढे होय. स्थलांतर कधी शहरीकरणामुळे तर कधी विकासामुळे होत असते. जेव्हा विकासाकरिता एखाद्या जागेवर धरण बांधले जाते, खाणी खोदल्या जातात, त्यावेळी तिथल्या ग्रामीण जीवनावर बराच परिणाम घडून येतो. त्या जागेच्या आजूबाजूच्या परिसरातील प्राण्यांना, पक्ष्यांना आपला निवारा संपादन करताना अडचणी येतात. मग स्थलांतर करणे भाग पडते. कारण मुद्दा असतो तो चांगले जीवनमान मिळविण्याचा आणि निवासाचा. आज नोकरीने जन्म घेतलाय, ही विकासाची बाब आपण नजरेआड करू शकत नाही. कारण वि.स. खांडेकर यांच्या भाषेत सांगायचे झाले तर, आपले घरटे सोडून बाहेर गेल्याशिवाय पाखराला आकाशाचा अर्थ कळत नाही.

वाढत्या राजकीय स्थैर्यामुळे १९९१ नंतरच्या नवीन आर्थिक धोरणामुळे अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल झाला आणि भारत पूर्वीच्या तुलनेत आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला. हे जरी खरे असले तरी अमेरिका, कॅनडा, इंग्लंड इ. देशात उच्चशिक्षितांचे होणारे स्थलांतर कमी होण्याचे नाव घेत नाही. युएनच्या अहवालानुसार जगातील एकूण स्थलांतरांपैकी ९ ते १० टक्के हे भारतीय आहेत. हे स्थलांतर चांगले की वाईट? हा प्रश्न अनुत्तरित आहे. परदेशातील स्थलांतर हे चांगली आर्थिक स्थिती आणण्यासाठी असते, तर देशांतर्गत बाबतीत अडचणी वाढल्या की, सामान्य माणसाचे जगणे अशक्यप्राय अवस्थेत येते व स्थलांतर करणे भाग पडते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोरोना. या परिस्थितीच्या वेळेस प्रत्येक स्थलांतरित व्यक्ती हा बहुतांशी कामगार, पिचलेला, घरी अठराविश्वे दारिद्र्य असलेला होता. उत्तरेकडून दक्षिणेकडे पोटपाण्याच्या सोयीसाठी गेलेला होता. त्यामुळे चांगल्या परिस्थितीला प्रत्यक्षात बघण्यासाठी, प्रत्येक समस्येतून मार्ग काढण्यासाठी स्थलांतर करणे आवश्यक असते, तेव्हा त्याच्या मनात नारायण सुर्वेंच्या खालील ओळी नक्कीच येत असतील -

*दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दुःखात गेले*
*हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे*
*भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबात झाली...*

का जात असावेत हे लोंढे उत्तरेकडून दक्षिणेकडे? याला कारण म्हणजे कासव संस्कृती व गरुड संस्कृती. स्थानिकांना, कासव संस्कृती, तर पीडितांना, बाहेरच्यांना गरुड संस्कृती पसंत असते. म्हणजेच कासव थोडे अंतर जाण्यास (उपाशी असले तरी) तयार नसते. याउलट गरुडाची शिकारीसाठी कितीही दूर जाण्याची तयारी असते. हे जरी खरे असले, तरी स्थलांतरितांमुळे समस्या निर्माण होतात. गुन्हे वाढतात, गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. स्थानिक व स्थलांतरित यांत राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक संघर्ष निमार्ण होतात. जुन्या संस्कृतीसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो; पण असं होणं अपरिहार्य आहे. कारण सतत बदलत राहणं, हाच संस्कृतीचा स्वभावधर्म आहे. स्थलांतरितांमुळे स्थानिकांच्या रोजगारावर कुऱ्हाड कोसळते, परंतु याचा फायदा कारखानदार, मोठे शेतकरी, कंत्राटदार यांना होतो, कारण त्यांना स्वस्तात मजूर मिळतो, परंतु यामुळे स्थलांतरित रगडला जातो. दारिद्र्याच्या दृष्टचक्रात अडकून जातो व जीवनमान खालावते. काही प्रसंगी बेरोजगारीची समस्या निर्माण होते. गरीब चतकोर भाकर मिळावी, म्हणून नाइलाजास्तव स्थलांतर करतो.

प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे स्थलांतराचे परिणाम चांगले किंवा वाईट असू शकतात. धरले तर चावते आणि सोडले तर पळते, या म्हणीप्रमाणे आपणच ठरवायचे की, काय योग्य आणि काय अयोग्य? कारण स्थलांतर करणे सोपे असते; पण येणाऱ्या समस्यांना तोंड देणे धीराचे काम असते. म्हणजेच स्थलांतर : एक आशा की समस्या? हा प्रश्न अनुत्तरितच राहील का? म्हणूनच म्हटले पाहिजे -

*कधीतरी श्रावणसरी बरसू दे,*
*बांधावरच्या बाभळीला नवीन अंकुर फुटू दे,*
*आशेची चूल पेटलीय, आता फक्त स्थलांतराचा प्रश्न सुटू दे...*

**(सहायक कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग.)**

(ESG) वचनबद्धतेचे ठोस उदाहरण आहे.

**पर्यावरण (E) :** कचरा पुनर्वापर, कंपोस्टिंगद्वारे जबाबदार संसाधन व्यवस्थापन. **सामाजिक (S) :** समुदाय सहभाग आणि निरोगी शहरी वातावरण प्रोत्साहन. **प्रशासन (G) :** समुदाय-केंद्रित प्रकल्पाचे पारदर्शक, जबाबदार व्यवस्थापन.

## हरित कौशल्ये आणि नावीन्य

**हरित नोकऱ्या :** गार्डनच्या देखभालीतील व्यावहारिक कौशल्यांमुळे (पुनर्वापर, कंपोस्टिंग) हरित कौशल्यांचा विकास होतो. ज्यामुळे भविष्यात हरित नोकऱ्यांची निर्मिती होऊ शकते (UN SDG 8).

**'सक्रिय प्रयोगशाळा' :** IITs आणि विद्यापीठांसाठी हे गार्डन शाश्वत सामग्री आणि कचऱ्यातून संसाधनांमध्ये रूपांतरण तंत्रज्ञानावरील संशोधनासाठी एक सक्रिय प्रयोगशाळा म्हणून काम करीत आहे (UN SDG 9).

## संधी आणि प्रेरणा

हा प्रभावी बदल केवळ बोलण्यातून नव्हे, तर ठोस कृतीतून सुरू होतो. या टेरेस गार्डनने विविध भागधारकांना त्यांच्या कार्यक्षेत्रात बदल घडविण्याची संधी दिली आहे.

**नियामक प्राधिकरणे (MPCB, कामगार सचिव) :** नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि कामगार व नागरिकांना थेट फायदा देणारे निरोगी वातावरण निर्माण करण्यासाठी एक स्थानिक मॉडेल.

**शहरी प्रशासन (महानगरपालिका) :** विकेंद्रीकृत कचरा व्यवस्थापन, शहरी हिरवळ आणि नागरिक सहभागासाठी एक किफायतशीर मॉडेल.

**धोरणकर्ते (निती आयोग) :** SDG अंमलबजावणीसाठी एक प्रतिकृती करण्यायोग्य, तळागाळातील मॉडेल, जे राष्ट्रीय धोरण शिफारसींसाठी उपयुक्त ठरू शकते.

**समुदाय नेतृत्व (CHS) :** सामूहिक कल्याणासाठी सामुदायिक सेवा प्रकल्पांना प्रेरणा आणि रहिवाशांमध्ये मजबूत बंध निर्माण.

**राष्ट्रीय सुरक्षा परिषद (NSC) :** डासांच्या प्रजननासारख्या पर्यावरणीय धोक्यांना संबोधित करून पर्यावरणीय सुरक्षा आणि आरोग्य संस्कृतीला प्रोत्साहन.

## भागीदारीद्वारे शाश्वत जग निर्माण करणे (SDG 17)

या उपक्रमाच्या केंद्रस्थानी संयुक्त राष्ट्रांचे शाश्वत विकास उद्दिष्ट १७: उद्दिष्टांसाठी भागीदारी हे आहे. कोणताही एक घटक शाश्वतता एकट्याने साध्य करू शकत नाही. हा उपक्रम समन्वयावर भर देतो :

**सरकारी संस्था :** स्थानिक प्रयत्नांना राज्य आणि राष्ट्रीय धोरणांशी जोडणे. **शैक्षणिक संस्था :** संशोधन आणि शैक्षणिक पोहोच यांचा लाभ घेणे. **उद्योग नेते :** ESG आणि CSR ला प्रोत्साहन देणे. **सामुदायिक संस्था :** नागरिकांना सक्षम करणे आणि सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे.

या सहकार्याच्या भावनेमुळे टेरेस गार्डनने निर्माण केलेले ज्ञान आणि सकारात्मक परिणाम मोठ्या प्रमाणावर रुजले जातात. **भविष्यासाठी दृष्टिकोन :** हे केवळ एक टेरेस नाही, तर एक चळवळ!

या उपक्रमाचा पुढील ५-१० वर्षांसाठी दृष्टिकोन केवळ या एका टेरेसपुरता मर्यादित नाही. शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये अशाच उपक्रमांचा व्यापक अवलंब करण्याचे स्वप्न आहे.

हा केवळ वनस्पतींची वाढ करण्याचा प्रयत्न नसून, विचारसरणीतही एक मोठा बदल घडवून आणण्याचा प्रयत्न आहे, निष्क्रियतेतून सक्रिय योगदानाकडे...

# वचनबद्धता



प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक संस्थेला आणि प्रत्येक प्रशासकीय संस्थेला कचऱ्यातून संपत्ती या तत्त्वांना आपल्या कार्यक्षेत्रात कसे लागू केले जाऊ शकते, याचा विचार करण्याची आजच्या काळाची गरज आहे.

हे केवळ एक गार्डन नसावे, तर एक पर्यावरण चळवळ असावी, यातून असे जग निर्माण होईल, जिथे प्रत्येक सजीव आणि निर्जीव घटक भरभराटीस येईल.

हा प्रेरणादायी उपक्रम यशस्वी होण्यामागे ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन, शिवाजी सानप यांनी वेळोवेळी मोलाचे प्रोत्साहन आणि सहकार्य केले असून, त्यांनी व त्यांच्या कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

तत्कालीन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, तहसीलदार सचिन चौधरी (जे स्वतः पर्यावरणाविषयी जागरूक आहेत.) यांचा या उपक्रमात सक्रिय सहभाग आहे. श्री. शिनगारे यांच्या शुभहस्ते पहिले झाड लावून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला होता. त्यांचे

अमूल्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन यामुळे उपक्रमाला बळकटी मिळाली.

### तत्कालीन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांची भेट आणि कौतुकाची थाप!

दिनांक ७ जुलै २०२५ रोजी तत्कालीन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी या टेरेस गार्डनला भेट दिली. यावेळी पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी यांनी त्यांना झाडांचे संगोपन; तसेच 'थ्रेड टू ट्रेंड' (जुने कपडे आणि धाग्यांपासून नवीन वस्तू बनवणे) याविषयी सविस्तर माहिती दिली.

या भेटीदरम्यान श्री. शिनगारे यांनी काढलेले उद्‌गार खूप महत्त्वाचे आहेत :-

टाकाऊ वस्तूपासून टिकाऊ, उपयोगी, स्वस्त अशी वस्तू निर्माण करणे हे अत्यंत कौतुकास्पद आहे. 3R म्हणजेच रिड्यूस (कमी करा), रियूज (पुन्हा वापरा) आणि रिसायकल (पुनर्वापर करा) या तत्त्वांचा अवलंब करून या गार्डनमधील वस्तू बनवलेल्या असून, आपली जीवनशैली याच तत्त्वांवर उभी करणे गरजेचे आहे. निसर्गपूरक व निसर्गसंवर्धन अशा पद्धतींचा अवलंब



आपल्या जीवनाचा भाग बनावा, ही शासनाची अपेक्षा आहेच, तोच धागा पकडून आपणही या कार्यात झोकून देऊ यात. जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, पर्यावरण अभ्यासक विजयकुमार कट्टी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक करावे तितके कमी आहे.

कृती करा, भेट द्या आणि सहभागी व्हा!

हा केवळ काही दिवस चालणारा उपक्रम नसून, निरंतरपणे नागरिकांमध्ये पर्यावरणासंबंधी कार्यशाळेच्या माध्यमातून जागरूकता निर्माण करण्याचे कार्य केले जात आहे.

चला तर, आपणही या पर्यावरण चळवळीचा भाग बनू या आणि आपल्या वसुंधरेसाठी एक उज्ज्वल भविष्य घडवू या!

या प्रेरणादायी टेरेस गार्डनला आपणही भेट देऊन प्रोत्साहन द्यावे, अशी आग्रहाची विनंती आहे. आपण कधी येताय या टेरेस गार्डनला भेट देण्यासाठी..? ठाणे जिल्हा माहिती कार्यालय आपल्या स्वागतासाठी आपली आतुरतेने वाट पाहत आहे!

**(जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे.)**

# जीव वाचवणारी देवमाणसं

**आशा पाटील**

साधारण सतरा-अठरा वर्षांपूर्वी सचिवालय जिमखान्यातर्फे आयोजित वर्षासहल ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील माहुली येथे गेली होती. जिमखाना सदस्य असल्याने मीसुद्धा या सहलीला गेले होते. माझ्यासोबत माझ्या मित्रमंडळींसह इतर अनोळखी माणसेदेखील सहलीला आली होती. त्यादिवशी सकाळी आम्ही मध्य रेल्वेने दादरहून आसनगाव आणि त्यापुढे टमटम रिक्षाने माहुली येथे पोहोचलो. तिथल्या एका शाळेत आम्ही सर्वांनी एकत्र नाश्ता केला आणि त्यानंतर पायी चालत चालत धबधब्याकडे निघालो.

धबधब्याखालच्या खळाळत्या पाण्यात असलेल्या छोट्यामोठ्या खडकांवर बसून सगळेजण कोसळणाऱ्या पाण्याचे तुषार अंगावर घेत पावसाचा मनमुराद आनंद घेत होते. आम्ही सहा-सातजण मात्र धबधब्याच्या आणखी थोडं जवळ असलेल्या उंच खडकावर बसून सहलीची मजा लुटत होतो. पावसाची संततधार तर सुरूच होती. अचानकपणे काही क्षणातच धबधब्यातून कोसळणाऱ्या पाण्याचा वेग वाढला आणि खालून वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाने रौद्ररूप धारण केले. जसजशी पाणीपातळी वाढली तसतसं आजूबाजूला छोट्या-मोठ्या खडकांवर बसलेली मंडळी पाण्यातून बाहेर पडली.

पाण्याचा प्रवाह इतका जोरदार होता की, आम्ही ज्या खडकावर बसलो होतो तिथून काठावर येण्यासाठी आधी गुडघाभर असलेलं पाणी आता आम्हाला पार बुडवेल असं जोरदारपणे वाहत होतं. त्यामुळे आम्हाला पाण्यातून बाहेर काठावर येणं खूपच कठीण झालं होतं. पावसाच्या संततधारेमुळे आणि पाण्याची पातळी अचानक वाढल्यामुळे आम्ही बसलेला खडक पाण्याखाली बुडून आमच्या जीवावर बेतणार होतं.

सुदैवाने आमच्यासोबत तेथील स्थानिक रहिवासी आणि आमचे काही गिर्यारोहक मित्र होते. त्यांनी यातून आमची सुटका करण्यासाठी काठावरच्या झाडापासून पाण्यातील मोठ्या खडकांभोवती दोऱ्या बांधल्या आणि त्यातील चार-पाचजण स्वतःच्या कमरेभोवती दोऱ्या गुंडाळून आमच्या मदतीसाठी वाहत्या पाण्यात उतरले. त्यानंतर आमच्याही कमरेभोवती दोरी गुंडाळली आणि आम्हाला दोन्ही पायांच्या अंगठ्यांनी खालचा दोर आणि हातांनी डोक्यावरचा दोर घट्ट पकडून भराभर पावलं टाकत काठावर यायला सांगितले. त्याप्रमाणे आम्ही एकेकाने दोन्ही पायांच्या अंगठ्यांनी आणि हातांनी दोऱ्या पकडत पलीकडे झाडावर आम्हाला घेण्यासाठी बसलेल्या एकाचा हात पकडला तसं त्याने आम्हाला पटकन त्याच्या दिशेने ओढून सुखरूप पाण्याबाहेर काठावर आणले.

माझ्या या वर्षासहलीच्या प्रवासात मला भेटलेली ही माणसे देवदुतासारखी मदतीला धावून आली आणि म्हणूनच आमचे प्राण वाचले. त्याबद्दल मी त्यांची अखंड ऋणी आहे.

**(वरिष्ठ स्वीय साहाय्यक, लोकआयुक्त आणि उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.)**

शैलजा वाघ-दांदळे

# स्मायली...

प्रत्येक व्यक्ती एक स्मायली असू शकतो. तो आणतो आनंदाचे झाड..

साधारण संध्याकाळची वेळ, उन्हं परतायला लागलेली. सात्रिकोणी कुटुबांतील चिरंजीव साधारणतः पदवीच्या शेवटच्या वर्षाला... कानात हेडफोन टाकून मोठ्या मोठ्या टांगा टाकत... आपल्याच तालात जिना चढत डायरेक्ट हॉलमध्ये एन्ट्री...

किचनमधून मातोश्रींचा जोरात आवाज.... अरे आधी ते कपाट आवरून घे आज कपडे अस्ताव्यस्त.... किती गबाळा रे तू सस्मित.. स्वतःच्या ध्यानात किंचितही बदल न करता सस्मित (फ्रेंड्स लोकांचा लाडका स्मायली) डायनिंग टेबलवर येऊन,'मम्मे पटकन काहीतरी दे बरं...खूप भूक लागलीये...'

किचनमधून थालीपिठासाठी मळलेल्या हातासह मातोश्री ताडकन जवळ येऊन सरळ स्मायलीच्या कानाचे हेडफोन अक्षरश: ओढून घेत, मातोश्रींनी चिरंजीवांना त्यांच्या विश्वातून भूतलावर आणले व सुरू केले उपदेशाचे डोस...

'अरे काही तरी संस्कार हवेत ना... काय, कुठल्या जगात असतोस? त्या पायातले शूज रॅकमध्ये का नाही ठेवले... आणि हे काय, हात नाही धुतलेस... अभ्यासात लक्ष नाही. कसं होणार तुझं.



माय डिअर मम्मी, सस्मितची स्वारी मातोश्रींच्या अगदी प्रेमाने जवळ येत म्हणाली, कशाला उगीच टेंशन घेतेस, किती सूचना देतेस सारख्या... प्लीज आधी थालीपीठ दे. अगं अमेरिकेतल्या आयांचा काही आदर्श ठेव. त्या बघ कशा फ्रीडम देतात.. तू आपली मला कुक्कुलं बाळ समजतेस.. तुझी काळजी मला कळले गं; पण त्रागा नको करूस गं. 'अरे, पण तू काय सारखं मोबाइलमध्ये डोकं खुपसून असतो.' असे म्हणत असतानाच थालीपिठावर मऊसूत लोण्याचा गोळा विराजमान होत होता... पुढच्या पाच मिनिटात स्मायली अक्षरश: किंचाळत आईजवळ गेला..'येस....'

काय झालं रे? काळजीने सतत कुरतडणाऱ्या मातोश्रीचा काळजीयुक्त स्वर.. काय झालं किंचाळायला...? असे म्हणेपर्यंत मातोश्रीभोवती सस्मित गिरक्या घेत होता. ..अगं मी रिॲलिटी शोसाठी सिलेक्ट झालोय तीन चार दिवसात ऑडिशन आहे... अगं आई याचसाठी मी मोबाइलवर चिटकून असतो.

संध्याकाळी बाबाची घरात एन्ट्री. मातोश्रींनी घरात एन्ट्री होताच लेकाच्या सिलेक्शनची बातमी व गरम थालीपिठाची प्लेट दोनही सोबतच समोर ठेवल्या. सवयीप्रमाणे वडिलांनी मानेनं होकार दिला. पुढच्या दोन तासात अपार्टमेंटमधल्या शेजाऱ्यांसोबतच सगळ्या नातेवाइकांना ही बातमी कळली. हजार चौकशा, शंभर कुजके प्रश्न, त्यासाठी आलेल्या शेजाऱ्यांना चहापान करत संध्याकाळ झाली.

अमर्याद वाट पाहून शेवटी तो दिवस आला. मामा, मामी, काका, काकू, यासह बाबाच्या ऑफिसातील सहकाऱ्यांसह अनेक जणांचे डोळे टीव्हीवर होते. मातोश्री प्राण डोळ्यात आणून टी.व्ही. समोर होत्या. ॲक्टिंग शो झाला. सहभागी असणाऱ्या प्रत्येकांचे स्किल दाखवणारे स्किट झाले. विजेत्यांच्या नावाची घोषणा झाली. मातोश्रीचा जीव हेलकावे खात होता. अनपेक्षितपणे स्मायलीला उत्कृष्ट सादरीकरणाचा पुरस्कर मिळाला! घेताना कधी नव्हे तो...सस्मित माझ्या आईसाठी ही भेट, असं पुटपुटला. मातोश्रीच्या डोळ्यांत एकाच वेळेस आनंद, अभिमान, आश्चर्य या भावनांची सरमिसळ करणारी आंदोलने दिसत होती. घरात एक आनंदी निरव शांततेची चादर पसरली, काही वेळ... मातोश्रींनी देव्हाऱ्यातील देवापुढे हात जोडले. थोड्याच वेळात दोस्तांच्या गलक्यात स्मायली आला... पुन्हा आवाज, गोंधळ.. आनंदाच्या ओघात हॉलमध्ये शूजसहित आत येणाऱ्या पोरांना म्हणाला... शूज रॅकमध्ये ठेवा रे.. आईला सतत आवरावं लागतं.. क्षणार्धात सस्मित मोठ्या झाल्याचा भास मातोश्रींना झाला. किचनमधून थालीपिठाचा खमंग दरवळ येत होता...आणि घरात पुन्हा तोच कलकलाट...

**(माहिती अधिकारी, भंडारा.)**

निलेश तायडे

जागतिक स्तरावर वाहन क्षेत्रात बदलाचे वारे झपाट्याने वाहत आहेत. या बदलांचा देशातील वाहन क्षेत्रातही शिरकाव झाला आहे. कुठलाही अनुकूल बदल अंगीकारून त्यामध्ये आघाडी घेण्याचा महाराष्ट्राचा हातखंडा वाहन क्षेत्रातील बदलांमध्येसुद्धा दिसून येत आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण अमलात आणण्याचा शासनाने घेतलेला निर्णय हा या बदलांचाच एक भाग आहे. राज्याने कार्बन उत्सर्जन कमी करून पर्यावरण संवर्धनासह स्वच्छ इंधनासाठी इलेक्ट्रिक वाहन (ई.व्ही) धोरण राबविण्याचा निर्णय राज्याला नवी दिशा देणारा ठरणार आहे.

# पर्यावरण संवर्धन आणि ईव्ही धोरण

यापूर्वी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने २३ जुलै २०२१ रोजी महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२१ जाहीर केले. या धोरणाच्या अंमलबजावणीचा कालावधी ३१ मार्च २०२५ पर्यंत होता. त्यामुळे शासनाने १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०३० या पाच वर्षांच्या कालावधीकरिता महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ लागू केले आहे.

या धोरणामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन व वापर यास व्यापक प्रमाणावर चालना देण्यात येत आहे. चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांचा विस्तार करीत विकासाची, पर्यावरण संवर्धनाची शाश्वतता, आर्थिक उन्नती व ऊर्जा सुरक्षिततेमध्ये योगदान देणाऱ्या नावीन्यपूर्ण परिवहन उपाययोजनांना प्रोत्साहन देण्याचाही समावेश आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या क्षेत्रात महाराष्ट्राला भारतातील आघाडीचे केंद्र करण्याचा दृष्टिकोनही या धोरणात आहे.

## धोरणाची वैशिष्ट्ये

- प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधांचा विकास करून वाहनांच्या सर्व प्रवर्गात इलेक्ट्रिक वाहनांच्या स्वीकाराला चालना देणे.
- नावीन्यपूर्ण संशोधनाची आणि कौशल्य विकास करून महाराष्ट्रातील इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता मजबूत करणे.
- शहरी व ग्रामीण भागात इलेक्ट्रिक वाहनांच्या सुरळीत परिचालनासाठी चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांची व्यापक उपलब्धता करणे.
- बॅटरीच्या पुनर्चक्रण व पुनर्वापर करण्यावर भर देणे.
- वाहनांच्या सायलेन्सरमधून हरितगृह वायूंचे शून्य उत्सर्जन करून स्थानिक हवेचे प्रदूषण कमी करणे.
- बसेस, मालवाहतूक वाहने, शहरी उपयोगिता वाहने यांवर लक्ष केंद्रित करणे.
- सार्वजनिक वाहतुकीचे विद्युतीकरण करण्यासाठी अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांवर विशेष भर देणे.
- राज्यात महत्त्वाच्या महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांना सहज उपलब्ध व्हावे, यासाठी संपूर्ण राज्यात इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगचे मजबूत जाळे विकसित करणे.
- सवलती व धोरणात्मक पाठबळाच्या आधारे इलेक्ट्रिक वाहनांच्या उत्पादनाला प्रोत्साहन देणे, इलेक्ट्रिक वाहनांची पुरवठा साखळी मजबूत करणे.
- बॅटरीचे पुनर्चक्रण आणि त्याच्या घटकांचे उत्पादन करणे.
- राज्यातील इलेक्ट्रिक वाहनांच्या संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी या क्षेत्रात नवकल्पना, कौशल्य व प्रतिभा विकसित करणे.
- आर्थिक वर्ष २०३० पर्यंत राज्यातील वाहतूक क्षेत्रातून ३२५ टन पीएम २.५ उत्सर्जने आणि १ दशलक्ष टन हरित गृह वायू (GHG) उत्सर्जन रोखणे.

## धोरणाची उद्दिष्टे

उद्दिष्टांनुसार इलेक्ट्रिक वाहनांचे अंतर्वेशन आणि चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा विकसित करणे आवश्यक आहे. सर्व वाहनांमध्ये ३० टक्के वाहने इलेक्ट्रिक असावीत; तसेच इलेक्ट्रिक प्रकारात दुचाकी वाहने (एल १ व एल २) ४० टक्के, तीनचाकी वाहने ४० टक्के, तीनचाकी मालवाहू वाहने ४० टक्के, चारचाकी वाहने ३० टक्के, चारचाकी मालवाहू वाहने २५ टक्के (एन १), चारचाकी मालवाहू वाहने २० टक्के (एन २ व एन ३), शहरी परिवहन उपक्रमातील बसेस ४० टक्के, खासगी व परिवहन उपक्रमातील बसेस १५ टक्के, शेतीसाठीचे ट्रॅक्टर आणि एकत्रित कापणी यंत्रे १० टक्के करण्याचे उद्दिष्टे आहे.




शासकीय वाहनांच्या ताफ्याचे इलेक्ट्रिक प्रकाराकडे टप्प्याटप्प्याने संक्रमण करून महामार्गांवर दर २५ किलोमीटर अंतरावर चार्जिंग सुविधा आणि शासकीय कार्यालयाच्या वाहनतळ ठिकाणी किमान एक वाहन चार्जिंग सुविधा करण्यात यावी.

## प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना पथकर माफ

या उपक्रमाचा म्हणून मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्ग, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग आणि अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतूवर प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांना १०० टक्के पथकर माफी देण्यात येते. या

महामार्गांवरील प्रवासी इलेक्ट्रिक वाहनांच्या पथकर माफी रकमेची प्रतिपूर्ती अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे परिवहन विभागाकडून संबंधित विभाग, प्राधिकरणास करण्यात येणार आहे.

## चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा

राज्यभरात इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार होण्यासाठी राज्यामध्ये चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांचा भक्कम विकास करण्यात येईल. राज्य व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक २५ कि.मी. अंतराने इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधांची उभारणी केली जाणार आहे. तांत्रिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून राज्य व राष्ट्रीय महामार्गावरील सर्व सध्या अस्तित्वात असलेल्या व नवीन इंधन स्थानकांवर इलेक्ट्रिक वाहनांसाठी किमान एक चार्जिंग सुविधा असेल. तांत्रिक व्यवहार्यतेच्या अधीन राहून, राज्यातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची सर्व बस स्थानके, बस थांब्यांवर किमान एक जलद चार्जिंग स्थानक उभारण्यात येईल. महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांना उच्च ऊर्जा चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांच्या सुरळीत कार्यान्वयनासाठी जलद चार्जिंग स्थानकांच्या स्थापनेसाठी थेट विद्युत पुरवठा यंत्रणेची स्थापना करण्यात येईल. महामार्गावरील इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्थानके सहजगत्या ओळखू येण्यासाठी स्थानक चालकांनी उंच व दूरवरून सहजपणे दिसून येणाऱ्या सूचना फलकांचा उपयोग करावा. शाश्वत ऊर्जेच्या वापरावर आधारित व बॅटरी साठवण प्रणालीच्या उपलब्धतेनुसार इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्थानकांची वर्गवारी करण्यासाठी यथायोग्य कार्यपद्धती विकसित करणे योजनेत समाविष्ट असेल. चार्जिंग केंद्र परिचालकाने एकात्मिक ऊर्जा पद्धतीचे अनुपालन करण्यासाठी हे धोरण प्रोत्साहन देईल. इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग विषयक पायाभूत सुविधांच्या स्थापनेसाठी सुकरपणे मान्यता देण्यासाठी राज्यामध्ये कालबद्ध एक खिडकी ऑनलाइन मान्यता प्रणाली स्थापित करण्यात येईल.

## चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांसाठी सवलती

चारचाकी इलेक्ट्रिक वाहने, इलेक्ट्रिक बसेस व ट्रकसाठी चार्जिंग केंद्रात किमान चार चार्जिंग बिंदू स्थापित असणे आवश्यक आहे. थेट विद्युत पुरवठा ५० ते २५० किलोवॅट ऊर्जा श्रेणीत असून प्रती स्थानक कमाल मर्यादा ५ लाख रुपये आहे. सवलत द्यावयाच्या सार्वजनिक, निम्न सार्वजनिक चार्जिंग स्थानकांची कमाल संख्या १००० आहे. तसेच बस व ट्रक चार्जिंग केंद्रात किमान दोन चार्जिंग बिंदू स्थापित असणे आवश्यक आहे. थेट विद्युत पुरवठा असलेली उच्च ऊर्जा २५० ते ५०० किलोवॅट असणे आवश्यक असून प्रती स्थानक कमाल मर्यादा १० लाख रुपये आहे. सवलत द्यावयाच्या सार्वजनिक, निम्न सार्वजनिक चार्जिंग स्थानकांची कमाल संख्या ५०० आहे.

## चार्जिंग सुविधा

चार्जिंग सुविधांच्या सुसज्जतेसाठी सर्व नवीन रहिवासी इमारतींची संरचना व बांधकामे त्या पद्धतीने करण्यात येईल. सर्व नवीन व्यावसायिक इमारतीतील वाहनतळाच्या जागेपैकी किमान ५० टक्के जागा ही इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगसाठी योग्य असेल. त्यामध्ये भविष्यात चार्जिंग केंद्राची उभारणी करण्यासाठी वाहनतळी तारांची रचना करण्याची व्यवस्था असेल. सामाईक वाहनतळ असलेल्या सद्य व्यावसायिक इमारतीत २० टक्के जागेत चालू स्थितीतील चार्जिंग स्थानके अस्तित्वात असणे आवश्यक आहे. प्रत्येक नवीन निवासी इमारतीत इलेक्ट्रिक वाहनांच्या सामूहिक चार्जिंग बिंदूसाठी समर्पित चार्जिंग बिंदू असणे अनिवार्य असेल.

गृहनिर्माण संस्थेच्या किमान ५० टक्के सभासदांच्या मान्यतेच्या अधीन राहून व सर्व सुरक्षितता प्रमाणकाचे अनुपालन करून इलेक्ट्रिक वाहनांच्या सामूहिक चार्जिंगसाठी जागा देण्यात यावी. चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी आणि इलेक्ट्रिक वाहनांतून दीर्घपल्ल्याच्या प्रवासाला पाठबळ देण्यासाठी महाराष्ट्रातील महत्त्वाच्या राष्ट्रीय व राज्य महामार्गांचे विद्युतीकरण करण्यात येईल. जलद चार्जिंग स्थानकांची उभारणी या विद्युतीकरण प्रक्रियेत समाविष्ट आहे. तसेच महामार्ग नियोजनाचा अविभाज्य भाग म्हणून राज्यातील सर्व नवीन हरित महामार्गावर इलेक्ट्रिक वाहनासाठी चार्जिंग सुविधा विकसित केल्या जातील.

## संशोधन व विकास

इलेक्ट्रिक वाहने, चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा, हायड्रोजन तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने संशोधन व विकासावर लक्ष केंद्रित करण्यासाठी किमान तीन यथोचित स्थानी सर्वोत्कृष्टता केंद्रे स्थापन करण्यात येतील. मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आदी शहरांमध्ये या केंद्रांची स्थापना करण्यात येईल. लिथियमवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सोडियम आयन बॅटरीसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा विकास करून ऊर्जा कार्यक्षमतेत सुधारणा करण्यात येईल. आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि पुरवठा साखळीची लवचिकता वाढविण्यासाठी पॉवर इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक वाहन पुरवठा उपकरणे यांचे स्वदेशीकरण करण्यात येईल. परिवहन क्षेत्रात निकार्बनीकरणाला पाठबळ देण्यासाठी बायोमासवर आधारित हरित हायड्रोजन निर्मिती करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल. इलेक्ट्रिक वाहन उत्पादन उद्योगाला कौशल्यपूर्ण प्रज्ञा समूह विकसित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळाने विशेष अभ्यासक्रमाची आखणी करावी. उद्योगाच्या गरजा आणि जागतिक स्तरावरील सर्वोत्तम पद्धतींचा विचार करून या अभ्यासक्रमात इलेक्ट्रिक वाहनांची संरचना, बॅटरी तंत्रज्ञान, चार्जिंगविषयक पायाभूत सुविधा, पॉवर इलेक्ट्रॉनिक आणि ऊर्जा व्यवस्थापनाचा समावेश करावा.

राज्यात कार्बन उत्सर्जन कमी करून स्वच्छ इंधनाचा पर्याय इलेक्ट्रिक वाहनांमुळे मिळत आहे. हे धोरण प्रदूषण कमी करणे, जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणे, सार्वजनिक आरोग्य सुधारणे आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर बनविणे यासाठी आवश्यक आहे. इलेक्ट्रिक वाहन निर्मितीला चालना देणे, चार्जिंग पायाभूत सुविधा विकसित करणे, शाश्वत पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था निर्माण करणे आदी बाबी या धोरणामुळे साध्य करणे निश्चितच शक्य होणार आहे.

**(विभागीय संपर्क अधिकारी)**

# एकटेपणा

चंद्रशेखर पालव

***'थिंक पॉझिटिव्ह' नावाचा एक दिवाळी अंक आज लायब्ररीत हाती आला.. आणि याची थीम आहे एकटेपणा. पूर्ण अंक याच विषयाला वाहिलेला आहे. या अंकातील एकटेपणातून बाहेर येण्याचा रियाज! हा श्री ऐश्वर्य पाटेकर यांचा लेख वाचनात आला. सदर लेखक हे पहिल्या 'युवा साहित्य अकादमी पुरस्कार'चे मानकरी आहेत, आणि त्यांची 'भुईशास्त्र' आणि 'जू' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या या लेखातील एक सुंदर भाग खाली देत आहे.***

मला आमच्या इथं गावातील बियावाल्या बाईची गोष्ट आठवते. बियावाली बाई. सतत बिया गोळा करत असायची. म्हणजे तेच तिचं आयुष्यभराचं काम होऊन गेलं होतं. जिथे बी खोचली तिथं झाड उभं राहायचं. हा तिचा हातगुण होता की झाडा-कोडावरची माया? माहीत नाही.

मी तिला माझ्या लहान वयापासून पाहत आलो. ती सारखी बिया गोळा करायची. तिने पेरलेल्या बियांमधून किती झाडे उगवून आली, याची मोजदाद कशी करणार? अगणित झाडं. ज्या झाडाकडे बोट दाखवलं ते झाड बियावाल्या बाईनेच लावलेलं असायचं. म्हणजे तसं पाहायला गेलं तर उगवून आलेल्या एकूण एक झाडांवर तिची मालकी होती; पण तिने तशी कुठल्याच झाडावर मालकी सांगितली नाही.



बियावाल्या बाईला मूलबाळ काही झालं नाही. त्याचेही तिला कधी काही वाटलं नाही.

तिला एकदा आई म्हणाली होती, आत्याबाई, तुम्हाला मूलबाळ झाले असते तर आता नातू-पणतू तुमच्या अंगाखांद्यावर खेळले असते!

तेव्हा तिचे उत्तर होतं, नाही झालं तेच बरं! नाहीतर ही झाडा-कोडाची पोरं कुणी सांभाळली असती?

कसा जन्म जावा ओ आत्याबाई तुमचा?

तेव्हा ही बियावाली बाई म्हणाली, जसा तुझा भाकरी थापत-थापत जाणार, तसा माझी झाडे लावता-लावता! हा आता मला सांग तुझ्या भाकरी कुणी मोजल्या का? माझी झाडं मात्र मोजली जातात. तुला काय वाटलं मला मुलाची आस नव्हती?

होती गं.. पार झुरणीला लागले होते. त्यावेळेला माझी आत्या आली मदतीला धावून. तिलाही मूलबाळ नव्हतं. तिने मला एक बी दिली. म्हणाली, 'आपली कूस आपण नाही उजवू शकत, मात्र मातीची तर उजवू शकतो ना...'

दिलेली बी जेव्हा मी आळ्यात लावली, तर चौथ्या-पाचव्या दिवशी मातीवर आलेला हिरवा पोपटी कोंब पाहून मी हरकले. जणू मीच बाळंत झाले. मग नादच लागला..

अन् तसंही, किती लेकरा बाळावाल्या आया बाया होत्या, माझ्या भवतीच्या; पण आज त्या एकट्याच उरल्या. मी तरी माझ्या झाडांसोबत आहे.

माझ्या या लेकरा बाळांना पाय नाहीत, हे एका अर्थी बरंच झालं! त्यामुळे ते मला एकटीला सोडून नाही जाऊ शकत.

खूप अंतर्मुख केलं बियावाल्या बाईंच्या या छोट्याशा कथेने. आयुष्यात आपण प्रत्येकाने कधीनकधी एकटेपणा अनुभवलेला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या एका ग्लोबल सर्व्हेनुसार २०२० सालापर्यंत एकटेपणा हा जगात तीव्र आणि सर्वदूर पसरलेला आजार असेल, कारण हा आजार छुपा आहे, तो वरून दिसत जरी नसला तरी त्याच्याकडे दुर्लक्ष केल्यास तो नैराश्यकडे केव्हा घेऊन जातो, हे कळतही नाही.

आमच्या ओळखीत मोठ्या सरकारी हुद्यावरून निवृत्त झालेले एक काका आहेत. 5-BHK चा भला मोठ्ठा सुसज्ज फ्लॅट, ड्रायव्हर सह ३ गाड्या, घरात सर्व कामांना नोकर, मुलगा आणि सून सॉफ्टवेअर इंजिनीअर, नातू नुकताच कॉलेजला जाऊ लागलेला, यांना स्वतःला कुठेही बाहेर जायला स्वतंत्र गाडी. पण अडचण फक्त एकच 'एकटेपणा'. घरात प्रत्येकजण व्यस्थ. यांच्याशी बोलायलाच कुणी नाही.

माझ्या जवळच्या मैत्रिणीची आई. स्वतःचा बंगला, चांगल्या सरकारी संस्थेतून निवृत्त, पैशाच्या नियोजनाची उत्तम समज, स्टॉक मार्केटमध्ये ॲक्टिव्ह, दोन्ही मुलं सुस्थितीत आणि परदेशात; पण काही दिवसांपूर्वी एक छोट्याशा आजारपणानंतर त्यांचा आत्मविश्वास गेला आणि आता 'एकटेपणा'च्या आजाराची शिकार आहेत.

अशी कितीतरी लोकं आपल्याही पाहण्यात असतील. कारण हल्ली गृहिणी, शाळा कॉलेजमधील मुलांपासून, व्यावसायिक ते अगदी कॉर्पोरेट जगतातील उच्च पदस्थांपर्यंत आजकाल कुणीही 'एकटेपणा' या आजाराला बळी पडू शकतं, ही वस्तुस्थिती आहे.

वर उल्लेखलेल्या बियावाल्या बाईंना अशिक्षित, अडाणी कसं म्हणायचं? एकटेपणाच्या जाळ्यात सापडू नये, यासाठी ३ सूत्र नकळत आपल्या वागण्यातून देऊन जातात त्या...

पहिलं सूत्र म्हणजे, आपल्यातील पॅशन ओळखा, त्यात व्यस्त राहा...

दुसरं, आपलं दुःखं कुरवाळणं थांबवून, जे आहे त्यातही माझ्या दृष्टीने कसं चांगलंच होतंय, असा दृष्टिकोन ठेवा...

आणि तिसरं, खूप महत्त्वाचे सूत्र म्हणजे, आपण लावलेल्या झाडांवर कधीही आपली मालकी सांगू नका, थोडक्यात, detach राहायला शिका, दुसऱ्यांसाठी काही करण्याची सेवावृत्ती अंगी असू द्या.

**(निवृत्त आरेखन श्रेणी १, लेखाचित्र शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग.)**

# बालाश्रम (पाळणाघर) ते वृद्धाश्रम

**चंद्रशेखर पालव**

*(शहरामध्ये उद्‍भवत असलेल्या एका समस्येवर प्रकाश टाकणारी कथा)*

नरेशने काका–काकू, मामा–मामी आणि बहीण नंदा यांना मेसेज पाठवला मी आई–बाबांना वृद्धाश्रमात ठेवले.

नरेश – आई–बाबा, नंदा आणि सर्व नातेवाईकांच्या मते वाया गेलेला मुलगा. त्याच्या उनाड मित्रांबरोबर भटकणारा, कधी–कधी सिगारेट, दारू घेणारा, एकूणच बिघडलेला. कोणीही त्याच्याशी बोलत नव्हते, अगदी आई–बाबाही कामापुरतेच!

नरेशने तीन वर्षांपूर्वी सुरेखाबरोबर रजिस्टर पद्धतीने प्रेमविवाह केला. सर्वांना मेसेज पाठवला होता. कोणी येण्याची शक्यता नव्हतीच. आई–बाबाही नाइलाजाने उपस्थित होते. गेल्या वर्षी त्यांच्या संसारवेलीवर एक फूल उमलले. फोन कोणीही घेणार नाही हे माहीत असल्याने मुलाच्या बारशाला त्याने सर्वांना मेसेज पाठवला. कोणीही आले नाही.

म्हणून त्याने आज आई–बाबांना वृद्धाश्रमात ठेवल्याचा मेसेजच पाठवला.

दोन दिवसांनी एकापाठोपाठ काका, मामा व नंदा यांचे मेसेज आले आम्ही रविवारी येतोय. नरेश मनाशी हसला. चला, तयारीला लागू या.



रविवारी संध्याकाळी काका–काकू, मामा–मामी आणि नंदा एकत्रच आले. नरेश मनाशीच म्हणाला, म्हणजे हे सर्व एकमेकांशी बोलून, ठरवूनच आलेत तर. हेही बरे झाले.

सुरेखाने सर्वांना पाणी दिले. पाणी पिता–पिता नंदाने घरावर नजर फिरवली. हॉल छोटा असूनही वहिनीनं चांगलाच सजवलाय. हं, घरीच असते म्हणून.

तेवढ्यात काकांनी विषयाला हात घातला, अरे, तुला जनाची नाही तर मनाची तरी लाज वाटायला पाहिजे. ज्यांनी तुला कष्ट करून लहानाचं मोठं केलं, त्यांना तू वृद्धाश्रमात ठेवलंस. एवढे बोलेपर्यंत त्यांचा चेहरा लाल झाला.

मामांनी री ओढली, उतारवयात त्यांच्याकडे लक्ष दिलं पाहिजे, त्यांना आधार दिला पाहिजे, ते सोडून तू आई–बाबांना वृद्धाश्रमात टाकलंस. अरे, या वयात त्यांना प्रेमाची, मुलांची गरज असते.

नंदाने आपला राग बाहेर काढला, एवढं होतं, तर वहिनीला नोकरीला पाठवना, चांगली शिकलेली, कॉम्पुटर प्रोगामर आहे की.

बहुतेक सर्वांच बोलून झाले होते. नरेशने सुरुवात केली.

माझ्या जन्माच्या आधीपासून आई–बाबा नोकरी करतायत. साधारण एक वर्षाचा असल्यापासून मला पाळणाघरात ठेवायला लागले. माझ्या संमतीचा प्रश्नच नव्हता. पुढे मला जसं थोडं समजायला लागलं तसं मला नेहमी आई जवळ असावी, आईबरोबरच राहावं, ही इच्छा मनात घर करून राहिली आणि दिवसेंदिवस ती प्रबळ होत गेली. सकाळी बाबा शाळेत सोडायचे, तिथून बसने पाळणाघरात आणि रात्री घरी असं माझं बालपण गेलं. शाळेत माझ्या काही मित्रांना त्यांची आई घ्यायला यायची. किती आनंदाने ते जाऊन आईला बिलगत होते! ते पाहून मला त्यांचा खूप हेवा वाटायचा. मला जे सुख मिळत नाही ते त्यांना मिळताना बघून पुढे–पुढे मला त्यांचा राग यायला लागला.

काका, लहानाचा मोठा मी पाळणाघरात झालो. फक्त झोपण्यापूरतं मला घरी आणलं जायचं. मी आईचे प्रेम मिळवण्यासाठी धडपडत होतो; पण माझ्या वाट्याला ते आलचं नाही.

मला नेहमी वाटायचं आईने मला जवळ घेऊन बसावं, तिच्या मांडीवर बसून मी खेळावं, तिने माझ्याबरोबर खूप हसावं, खेळावं; पण आईला वेळ नव्हता. ज्या वयात मला काहीही समजतं नव्हतं, आई–बाबा हेच माझं विश्व होतं, आई–वडिलांची मला गरज होती. त्या वयात मला पाळणाघरात ठेवलं गेलं. काय फरक आहे हो पाळणाघरात नि वृद्धाश्रमात? तुम्ही त्याला कितीही गोंडस नाव दिलंत, पाळणाघर, बेबी–सिटर वा आणखी काहीही, तरी माझ्या दृष्टीने तो बालाश्रमच आहे. जसा वृद्धाश्रम तसाच हा बालाश्रम. माझ्या भावनाही मला व्यक्त

करत्या येत नव्हत्या, अशा वयात मला आई-वडिलांची, त्यांच्या आधाराची जास्त गरज होती, त्यावेळी मला त्या बालाश्रमात डांबलं गेलं. त्यावेळी तुम्ही कोणी आला नाहीत बोलायला.

सगळेजण गप्प होते. नरेश पुढे म्हणाला, मला जसं समजायला लागलं तसं मी घरी आल्यावर आईने मला भरवावं म्हणून हट्ट करू लागलो की जेणेकरुन आई मला जवळ घेऊन मांडीवर बसवून भरवेल. पण उलट मला मार मिळायचा. आईला तिची कामं असायची. मलाच हाताने खायला लावायचे. एकदा मी आजारी पडलो, ताप होता. त्यावेळी आईने सुट्टी घेतली, मला खूप आनंद झाला. आता दिवसभर आई आपल्याला मिळेल; पण छे, फक्त औषध देण्यापुरत ती माझ्याजवळ आली नंतर घरातली राहिलेली कामं करायला गेली. मला खूप राग आला; पण एक समजलं, आजारी पडलं की आई सुट्टी घेते. मग मी मुद्दाम आजारी पडायला लागलो; पण सुट्टी घेउनही आई वा बाबा माझ्या वाट्याला जास्त आलेच नाहीत. ते त्यांच्या कामातच मग्न, कधी घरची तर कधी ऑफिसमधून आणलेली. माझी आई-प्रेमाची भूक दिवसेंदिवस वाढतच होती आणि त्यातूनच माझं अभ्यासातील लक्ष कमी होऊ लागलं.

मार्क कमी पडू लागले आणि मला वाटलं आतातरी आई-बाबा माझ्या बरोबर बसून माझा अभ्यास घेतील. त्याऐवजी त्यांनी मला ट्यूशन लावली. आतातर आई-बाबांचा सहवास फक्त रात्री जेवणापुरताच मिळू लागला. आई-बाबांचं लक्ष आपल्याकडे कसे वेधता येईल, याभोवतीच माझं लक्ष केंद्रित होऊ लागलं. एके दिवशी रस्त्यात पडलेला सिगारेटचा तुकडा मी उचलून डब्याच्या पिशवीत ठेवला. रात्री आईने तो पाहिला, मला वाटलं आता तरी दोघेही मला जवळ घेऊन माझ्याशी बोलतील आणि मग मी त्यांना खरं ते सांगेन. मला मिळाला फक्त मार आणि सज्जड दम. त्यावेळी मला समजलं आई-बाबा यांच्या विश्वात मला स्थान नाही आणि ज्या प्रेमासाठी माझं मन आसुसलं आहे, ते मला मिळणार नाही. त्यांची बोलणी आणि मार नेहमीचा झाला आणि मी कोडगा बनत गेलो.

थोडा वेळ कोणी काहीच बोललं नाही. काकू प्रथमच बोलल्या, अरे, त्यांच्या भावनांचा तरी विचार करायचास, त्यांना काय वाटलं असेल आणि समाज काय म्हणेल याचा तरी विचार कर.

नरेश उसळून म्हणाला, वृद्धाश्रमातील वृद्धांच्या भावना तुम्हाला दिसतात; पण ज्या बछड्यांना नीट बोलताही येत नाही, आपल्या भावना व्यक्त करता येत नाहीत, त्यांना भावना नाहीत? वृद्धांच्या डोळ्यातले अश्रू तुम्हाला दिसतात आणि त्या कोवळ्या लहानग्यांच्या डोळ्यातून वाहणारे पाट तुम्हाला दिसत नाहीत? आईसाठी ते रडले तर त्यांना मारून, आमिष दाखवून बालाश्रमात डांबतात आणि समाज गप्प राहतोय, वा रे समाज!

काका समजावणीच्या सुरात म्हणाले, अरे, दोघांनी नोकरी करणं गरजेचं होतं. त्यामुळे पाळणाघरात ठेवणं गरजेचं होतं.

नरेश उत्तरला, त्यावेळी त्यांना गरज होती, म्हणून त्यांनी मला बालाश्रमात ठेवलं, आज माझी गरज आहे, म्हणून मी त्यांना वृद्धाश्रमात ठेवलं.

काही काळ निरव शांततेत गेला. नरेशने सुरेखाला काही खूण केली, त्याबरोबर तिने जाऊन बेडरूमच्या दरवाज्याची कडी काढली आणि हुंदके देत आई बाहेर आली आणि नरेशचं मस्तक छातीशी धरुन त्याचे पटापट मुके घेऊ लागली. या अनपेक्षित झालेल्या वात्सल्याच्या वर्षावाने क्षणभर नरेश गोंधळला, अखेर त्याचाही बांध कोसळला आणि दोघांच्याही डोळ्यातून वाहणाऱ्या गंगा आणि यमुनेचा संगम होऊन त्या पुरात ते चिंब भिजले. त्या दोघांना वेगळं करण्याची हिंमत कुणाकडेच नव्हती. बाबाही हळूच येऊन जमिनीकडे बघत सोफ्यावर बसले. एकच क्रिया ते सतत करत होते, डोळ्यांना रुमाल लावणे. थोड्यावेळाने नरेश भानावर आला आणि त्याने आईला हाताला धरून सोफ्यावर बसवले.

नरेश म्हणाला, नंदा, तू म्हणते सुरेखाला नोकरीला पाठव. मी जे भोगलं तेच आमच्या मुलाच्या वाट्याला आम्ही येऊ देणार नाही. संसारगाड्याची दोन चाके आहेत, एक अर्थार्जन आणि दुसरे घर. दोघांनीही नोकरी केली की, रोज दोघांचीही धावपळ, कामाचा तणाव यात दोघांनाही ना मुलाकडे ना आई-बाबांकडे लक्ष देता येणार. त्यातून होणारी चिडचिड, नैराश्य यामुळे बिघडलेलं सर्वांच आणि पर्यायाने घराचं स्वास्थ. या सर्वांचा विचार करून लग्नाआधी आम्ही बोललो आणि ठरवलं की, एकाने अर्थार्जन करायचे आणि एकाने संपूर्ण घर आणि कुटुंबाकडे लक्ष द्यायचे आणि महत्त्वाचे म्हणजे मला माझ्या मुलाला बालाश्रमात ठेवायचं नाहीये. आई-बाबा थकलेत आणि त्यांच्यावर मला मुलाची जबाबदारी सोपवायची नाही. आजपर्यंत ते इच्छा मारूनच जगले, आता त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे राहू द्यायचंय. आज संसाराच्या गाड्याच एक चाक, घर, सुरेखा पूर्णपणे सांभाळत असल्यानेच मी माझ्या कामात निर्धास्तपणे झोकून देऊन कामामध्ये नवीन जबाबदाऱ्या घेऊन यशस्वीरीत्या पार पाडू शकलो. आणि त्यामुळेच गेल्या महिन्यात मला मार्केटींग मॅनेजर पदावर बढती मिळाली.

नरेशने आतून पेढ्याचा बॉक्स आणला व स्वतःच्या हाताने आईला पेढा भरवला. नंतर बाबांच्याही खांद्यावर हात ठेवून त्यांनाही पेढा भरवला आणि मग सर्वांना पेढे दिले.

काका म्हणाले, पण तू हे सर्व नाटक कशासाठी केलं.

नरेश हसला आणि म्हणाला, सुरेखा खूप दिवसांपासून म्हणत होती, एकदा सर्वांना बोलवून मनातील गैरसमज दूर करा आणि तुम्ही खरंच कसे आहात ते सर्वांना कळू द्या. मी बोलावलं असतं तर तुम्ही कुणीच आला नसता. म्हणून हे करावं लागलं.

मामी म्हणाल्या, खरंच तू आज आमचे डोळे उघडलेस आणि नरेश व्यसनी नसून एक जबाबदार मुलगा आहे हेही समजलं.

नरेश हसत म्हणाला, आजचा समाज हा स्वतःभोवती आणि पैशाभोवती केंद्रित झालाय, तो जर कुटुंबाभोवती केंद्रित झाला, तर आजच्या समाजातले कित्येक प्रश्न आपोआप सुटतील आणि मामी, मला व्यसन असं कधी नव्हतंच, आपल्याकडे लक्ष वेधून घेण्यासाठी केलेला तो एक प्रयत्न होता.

नरेशने आईकडे पाहिलं, अजूनही ती हुंदके आणि उसासे यातून सावरली नव्हती. नरेश आईजवळ गेला आणि त्याने आपले हात आईच्या गळ्याभोवती गुंफले आणि म्हणाला, आज मी जगातला सर्वात श्रीमंत माणूस आहे, आज मला माझी आई मिळाली...

**(निवृत्त आरेखन श्रेणी १, लेखाचित्र शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग.)**

# आठवणीतील रेडिओ...



**वीणा रानडे**

रेडिओची व माझी ओळख होऊन बरीच वर्षे उलटली आहेत. रेडिओची मुख्य खासियत म्हणजे वेळ कळते, घड्याळाकडे बघायची गरज नसते. त्याची पहिली ओळख झाली ती सकाळी आई रेडिओ लावायची त्यामुळे, सकाळी उठवण्यासाठी आधी पंखा बंद केला जायचा व मग रेडिओ लावला जायचा, त्या वेळी रेडिओची तीन चॅनेल्स असायची, मुंबई अ, ब व विविधभारती आम्ही बव्हंशी मुंबई ब ऐकायचो, सकाळी साधारण ५.४५ ते ६.०० च्या दरम्यान अभंग किंवा भूपाळ्या असायच्या, घनश्याम सुंदरा श्रीधरा, अरुणोदय झाला, उठी लवकरी वनमाळी, उदयाचली मित्र आला या भूपाळीने हमखास जाग यायची, मग आवरता आवरता त्यातील शब्दांचा अर्थ आई सांगायची.

त्यानंतर शेतकरी बांधवांसाठी कृषिवाणी प्रक्षेपित केली जायची, या कार्यक्रमात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त माहिती असायची. साधारण ६.०० च्या दरम्यान हिंदी मे वार्तापत्र ऐकवले जायचे, मग ६.०५ पासून मराठी गाणी असायची, मध्येच निवेदक १०० अंश मेगाहर्टझ व मध्यम लहरी व लघु लहरी असे काहीतरी अगम्य भाषेत बोलायचे, त्यांचे ऐकता ऐकता शाळेत जायची तयारी सुरू असायची, ७.०५ मि. झाली की आकाशवाणी मुंबई प्रादेशिक बातम्या देत आहेत, ठळक बातम्या.. बातम्या सुरू झाल्या की आमची रवानगी शाळेत व्हायची.

शाळेतून परत आल्यावर कामगार सभा किंवा वनिता मंडळ चालू असायचं, वनिता मंडळमधील दोघींचे संवाद अगदी मैत्रिणी एकमेकींशी बोलतात इतके सहज असायचे, संध्याकाळी परत तीच गाणी लागायची, नाविका रे वारा वाहे रे, च्या तरुतळी विसरले गीत काय बाई सांगू, कसं म सांगू अशी एकापेक्षा एक सुंदर गाणी इतक्या वेळा लागायची की, ती गाणी कुठे सोलात = पुरवा Viol सुरू होतो, हेदेखील एव्हाना पाठ झालेलं असायचं सुट्टीच्या दिवशी घरी असलो तर बातम्यांचा पुढील कार्यक्रमदेखील ऐकायला मिळायचा, प्रभाकरपंत, टेकाडे भाऊजी, मीना वहिनी यांचा हसतखेळत चाललेला संवाद ऐकायला खूपच मजा यायची. आपली आवड पण छान असायची. तसेच श्रोत्यांच्या पत्रांना उत्तरे, असा एक कार्यक्रम असायचा. हे झालं सगळं मुंबई 'ब'वरील कार्यक्रमाबद्दल. आम्ही विविधभारती वरील हिंदी गाणी आवडीने ऐकायचो, त्यात झुमरीतलय्या या गावातील श्रोत्यांनी पाठवलेली गाण्याची फर्माइश खास असायची. चिंटू, पिंकी, मिनी और उनके मम्मी पप्पा, दादा दादी यांनी पण गाण्याची शिफारस केलेली असायची. गावाला गेल्यावर हा रेडिओ काही साथ सोडायचा नाही, आजोबांच्या रेडिओच्या सकाळच्या बातम्यांनी सुरुवात व्हायची, रात्र व्हायची ती युववाणी व कॉफी हाऊस या कार्यक्रमांनी. तिथे रेडिओ ऐकणं हा एक सुंदर अनुभव असायचा कारण ना अभ्यासाची चिंता असायची ना वेळेवर कुठे जाण्याच बंधन असायचं. शांतपणे आजोबांच्या झोपाळ्यावर झोपून रेडिओ ऐकायचा. रात्री ते झोपाळ्यावर बसायचे. मी त्यांच्या मागे झोपून रेडिओ ऐकत असायचे, झोपाळा प्रचंड मोठा होता, त्यावर झोपून रेडिओ ऐकणे हा माझा कार्यक्रम पूर्ण सुट्टीभर चालू असायचा. मी आजोबांची लाडकी नात असल्याने माझ्याशिवाय त्या झोपाळ्यावर दुसऱ्या कोणाला बसायची परवानगी नव्हती. रेडिओ ऐकत कधी झोप लागायची ते कळायचे पण नाही. मी झोपले की मग आजी मला खाली उचलून ठेवायची. रेडिओवरील निवेदकांचे उच्चार इतके स्पष्ट असायचे की, कसे बोलले पाहिजे याचा तो एक आदर्श वस्तुपाठ्य असायचा. काम करता करता, जगातील घडामोडींची माहिती करून देणारे रेडिओ हे एक अजब यंत्र आहे, त्याची लोकप्रियता टीव्ही, मोबाइल किंवा इतर कितीही प्रलोभने आली तरी कमी होणार नाही हे नक्की! आता मी पण सकाळी रेडिओ लावते, माझा मुलगादेखील आवडीने रेडिओवरील गाणी ऐकतो, एक वर्तुळ पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

**(सामान्य प्रशासन विभाग )**

# उपवास

उपवास व राजगिरा हे समीकरण भरतामध्ये शेकडो वर्षांपासून चालत आले आहे.अंगारिका, एकादशी, चतुर्थीला शरीराला भरपूर पोषण देणाऱ्या पदार्थांमधे राजगिरा लाडू, चिक्की व दुधातून राजगिरा हे पदार्थ बरेचदा असतात. यामध्ये असलेल्या जीवनसत्व बी १, बी २, बी ५, बी ६, सी, ई वगैरेमुळे शरीर निरोगी व ऊर्जायुक्त राहायला मदत होते. आयुर्वेदामध्ये राजगिरा, रूचिवर्धक, रक्तशोधक, स्तन्यवर्धक तसेच मलसारक मानला जातो.



राजगिरा पचायला जड असतो, म्हणून वजन कमी करायला मदत करतो. नियमित सेवनाने, राजगिरा संधीवातामध्ये सुखकारक ठरतो.तंतुमय पदार्थ व पोटॅशियम असल्यामुळे हृदयाच्या मजबुतीसाठी व पचनक्रिया सुधारण्यासाठी राजगिरा उपयुक्त आहे.

इन्स्युलिन नियंत्रित करण्यासही राजगिरा योग्य ठरतो. मॅग्नेशिअमचे प्रमाण कमी असल्यामुळे अर्धशीशीवरील औषध म्हणूनही याचा वापर केला जातो. तंतुमय पदार्थ व अन् सॅच्युरेटेड फॅट्समुळे रक्तातील कोलेस्ट्रॉल कमी करायला मदत करतो. ज्यामुळे हृदय सक्षम राहते.




# कॅलेंडरची चित्रकथा...

**मीनल जोगळेकर**

आपल्या रोजच्या जीवनात ग्रेगेरियन किंवा इंग्रजी कालमापनाचा अर्थात कॅलेंडरचा उपयोग करतो. मात्र भारतीय कॅलेंडर शक संवत्सरावर आधारित असते. आपले सगळे सण-उत्सव त्यानुसार साजरे होत असल्याने व्यावहारिक इंग्रजी कालमापनासोबतच तिथी, नक्षत्र, वारावर आधारित दिनदर्शिकेची गरज आपल्याला असते. ही गरज आपल्या घरच्या भिंतीवरील दिनदर्शिका सहज पूर्ण करते. कॅलेंडरची परंपरा कधीपासून, कोणी, कुठे, कशी सुरू केली, या सनावळ्यांमध्ये न पडता आधुनिक काळात किमान मराठी माणूस तरी 'भिंतीवरी कालनिर्णय असावे' या बोधवचनापासून ती झाली असावी, असे मानतो. त्यापूर्वी राजा रविवर्मा यांनी रेखीवपणे रेखाटलेल्या देवादिकांच्या चित्रांनी कॅलेंडर सजलेली असायची, अनेक घरांमध्ये अशा कॅलेंडरची मुद्दाम खरेदी होऊन राजा रविवर्मा यांच्या कुंचल्यातून साकारलेला बाळकृष्ण किंवा लक्ष्मी माता सुबकशा फोटो फ्रेममधून दिवाणखाण्यांच्या भिंती सुशोभित करायचे. त्यानंतर राष्ट्रीयकृत बँकांनी आणि नवरत्न कंपन्यांनी ठळक इंग्रजी नंबरांमधल्या मोठ्या कॅलेंडरर्सनी आपला ग्राहक खूश करायला सुरुवात केली. नवीन वर्षाच्या पहिल्या महिन्यात तरी किमान बँकेत जाणाऱ्या ग्राहकांच्या हाती नवीन कॅलेंडरची भेट असतेच.

## दर्शनी भागाची शोभा

जगभरातली उत्तमोत्तम निसर्गचित्रे, पर्यटनस्थळे यांच्या सुरेख चित्रांनी नटलेली - सजलेली ही कॅलेंडर लोकही अगदी आनंदाने घरात दर्शनी भागात लावतात. शिवाय वर्ष संपल्यावर या जाड कागदाच्या आणि मागील बाजू पूर्णपणे पांढरीशुभ्र असणाऱ्या कॅलेंडरचा उपयोग वह्या-पुस्तकांना कव्हर घालण्यासाठीही उत्तमप्रकारे करतात. वस्तूंची उधळपट्टी नसलेल्या आणि पैशाची किंमत असणाऱ्या त्या काळात तर ही बचत फार सुखावून जायची. चांगली कव्हर्स मिळाल्याने बच्चे कंपनीही खूश !

समर्थ रामदासांच्या दासबोध किंवा मनाचे श्लोकातील उपदेशपर ओळीप्रमाणे टॅगलाइन घेऊन आलेल्या 'भिंतीवरी कालनिर्णय असावे' या ओळीने मात्र मराठी घराघरातल्या भिंतीचाच नव्हे, तर मनामनांचा ताबा घेतला. महाराष्ट्रातील गुजराती, कन्नड इ. भाषाकांनाही कालनिर्णयने आपलेसे केले, ते त्याच्या-त्याच्या भाषेत मिळू लागल्यामुळे!

## उपयुक्त माहिती

कालनिर्णय म्हणजे कॅलेंडर, पंचांग आणि प्रत्येक महिन्याच्या पाठच्या बाजूला असलेले, ज्ञानपीठ विजेत्या कुसुमाग्रजांपासून ते अगदी त्या-त्या काळातील नवोदित लोकप्रिय लेखकांनी लिहिलेले खास लेख! त्यासोबतच उपयुक्त टिप्स, लग्न-मुंज-वास्तुशांती इ.चे मुहूर्त, त्या महिन्याचे राशीभविष्य या सगळ्या उपयुक्त, भरगच्च मजकुरांमुळे ते संग्राह्यसुद्धा झाले. त्यातले गृहिणींसाठी मुख्य आकर्षण म्हणजे तिथे देण्यात आलेल्या पाककृती. कालनिर्णयने पाककृतींची स्पर्धा आयोजित



करून गृहिणींना रोख बक्षीस जिंकायची संधी तर दिलीच; पण दरवर्षी खास बक्षीसपात्र पाककृतींना कॅलेंडरचे मानाचे पानही लाभले! शिवाय एकादशी, संकष्टी; तसेच अनेक नित्योपचाराचे दिवस कॅलेंडरवर दिले असल्याने या कॅलेंडरने घराघरात ठाण मांडले. मराठी माणूस आणि कालनिर्णय हे समीकरण इतके रूढ झाले की, मराठी नाटक-चित्रपटांतून 'मराठी घर' स्थापित करण्यासाठी नेपथ्यकारांच्या यादीत हे कॅलेंडर अपरिहार्य ठरले! त्याच काळात लग्न होऊन सातासमुद्रापार गेलेल्या मराठी कन्यांनी ते सातासमुद्रापार नेले; पण अलीकडे या कॅलेंडरची इंग्रजी आवृत्तीही निघू लागली. त्यासोबतच लांबूनही लक्ष वेधून घेणारे कार्यालयातील मेगासाईज, कारमध्येही लावता येईल किंवा खिशात बाळगता येईल असे पॉकेट साईज, असे ग्राहकांच्या आवश्यकतेनुसार वेगवेगळ्या आकारात या कॅलेंडरला बसवण्यात आले.

कोणत्याही व्यवसायात लोकप्रिय उत्पादनांसारखी अनेक उत्पादने पुढे बाजारात येतात. तशीच या कॅलेंडरसारखी अनेक कॅलेंडर्स बाजारात आली असली तरी नवीन वर्ष आले की हे कॅलेंडर घेतले का? असेच आपण विचारतो. भिंतीवरील कॅलेंडर हे महिलांसाठी एक अगदी युटिलिटी प्रॉडक्ट म्हणावे लागेल, 'दूध, पेपरचा हिशोब, मुलांच्या डब्यात द्यायचा मेन्यू, नातेवाइकांचे वाढदिवस, कामवालीचे खाडे, अशा अनेक गोष्टी या कॅलेंडरच्या पानोपानी आपल्याला दिसतात, स्मार्टफोन हातात आला तरीही या कौटुंबिक आवश्यक गोष्टींची नोंद करण्याची गृहिणीची हक्काची जागा मात्र अजूनही कॅलेंडर हीच आहे.

## जनसंपर्काचे साधन

मंथ प्लॅनर, इयर प्लॅनर अशा स्वरूपातही कॅलेंडर कार्यालयातील टेबलावर विराजमान होऊ लागली. अलीकडच्या काळात सुंदर नट्यांची आकर्षक छायाचित्रे असलेली कॅलेंडर बाजारात उपलब्ध आहेत. लहान मुलांसाठी खास कविता, गोष्टी, सुंदर चित्रे यांची रेलचेल असलेली बालदर्शिकाही अलीकडे निघू लागली आहे. तसेच मर्यादित वितरणासाठी मोठमोठ्या गायक, वादक, कलाकारांचे विविध मूड्स टिपणारी उत्तमोत्तम छायाचित्रे असलेली कॅलेंडर्स छापण्यात येतात. दर्दी रसिकांची 'कलेक्टर्स चॉईस' झालेली आहेत. त्याशिवाय आरोग्यदर्शिका, वास्तूदर्शिका, भाग्योदय इ. नावे सार्थ ठरवणाऱ्या दिनदर्शिकाही बाजारात मोठ्या प्रमाणावर खपताना दिसतात. अनेक राजकरणी लोकांचे स्थानिक जनतेशी 'जनसंपर्क' ठेवण्याचे साधन म्हणून कॅलेंडरचा वापर केला जातो. तारीख – वारासह या कार्यसम्राटांनी केलेल्या कार्याचा आणि त्यांच्या छायाचित्रांचा मोफत अहेर कॅलेंडररूपाने त्याच्या मतदारसंघातील कुटुंबांना नववर्षाला लाभतो. तसेच अनेक राजकीय पक्ष, व्यावसायिक, दुकानदार आपल्या ग्राहकांना स्वतःची जाहिरात करणारे कॅलेंडर्स भेट देत असतात, ती बहुदा लग्नातील नावडत्या अहेराप्रमाणे पुढे-पुढे सरकवली जातात. एकूणच नवीन कॅलेंडरचा हा सोस साधारण महिनाभर टिकतो आणि पुढे वर्षच जुने होते. त्यामुळे कॅलेंडरचे नवेपणही संपते. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी काळ – काम – वेगावर ते मात करू शकत नाही, याची आठवण दरवर्षीचे नवीन कॅलेंडर करून देते, एवढे नक्की!

शक संवत्सरावर आधारित भारतीय कालमापनाला १९५७ मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय कॅलेंडरचा दर्जा दिला आहे. हे कॅलेंडर इंग्रजी कॅलेंडरप्रमाणेच कळायला सुलभ असून, ते व्यवहारातही वापरण्यासाठी त्याला अधिकृत दर्जा देण्यात आला आहे. अगदी राष्ट्रीयीकृत बँकेच्या धनादेश किंवा धनाकर्षावर भारतीय शक संवत्सरावर आधारित दिनांक लिहिण्यासही भारतीय रिझर्व बँकेची मान्यता आहे.



नवीन वर्षाची चाहूल आपल्याला लागते, ती जागोजागी दिसणाऱ्या कॅलेंडरच्या जाहिरातींनी! जाहिरात न करताही कॅलेंडरवाल्यांचा व्यवसाय होणारच असतो; पण लोकांची ऐनवेळी धावपळ नको या सद्भावनेतून ते दरवर्षी नवीन वर्ष येण्यापूर्वीच जाहिराती करून लोकांना आठवण करून देत असावेत! स्वार्थातून परमार्थ साधावा, ही शिकवण वर्षाच्या सुरुवातीलाच ते सर्वांना देतात, असे म्हणायला हरकत नाही.

आपलं मंत्रालय जानेवारी २०१८ मधून पुनर्मुद्रित.

**(उपसंचालक, पु. ल. देशपांडे अकादमी, मुंबई.)**

# हास्यकल्लोळ...




















व्यंगचित्रकार : जय जाधव

# सांस्कृतिक ठेवा














(सुलेखनकार : अजय भोसले, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.)

# भारतीय संविधान : राष्ट्राच्या शासनव्यवस्थेचा पाया



भारताचे संविधान

उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

भारतीय संविधान हे देशाचे सर्वोच्च आणि मूलभूत कायदे सांगणारे दस्तऐवज आहे. देशाची संपूर्ण शासनव्यवस्था कोणत्या पद्धतीने चालवायची, शासनाच्या विविध अंगांची रचना, अधिकार व जबाबदाऱ्या काय असतील आणि नागरिकांना कोणते अधिकार व कर्तव्ये दिली जातील, याची स्पष्ट मांडणी संविधानात करण्यात आली आहे.

भारतीय संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारण्यात आले आणि २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. या दिवशी भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही गणराज्य म्हणून जगासमोर स्थापित झाला. देशाच्या एकात्मता, न्याय आणि विकासाचा पाया संविधानानेच मजबूत केला आहे.

संविधान हे देशाचे सर्वोच्च कायदेशीर दस्तऐवज असल्याने कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका या तिन्ही घटकांना त्याची बंधनकारक चौकट लागू होते. शासनाची रचना, प्रक्रिया आणि अधिकार यांची स्पष्ट रूपरेषा यामध्ये दिली आहे. नागरिकांचे मूलभूत अधिकार, जसे की, स्वातंत्र्याचा अधिकार, समानतेचा अधिकार, सांस्कृतिक स्वातंत्र्य, यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या सन्मानाचा आणि सुरक्षिततेचा आधार तयार होतो. याचबरोबर नागरिकांनी पाळावयाची मूलभूत कर्तव्येही संविधानात नमूद आहेत. ज्यामुळे नागरिकत्व अधिक जबाबदार बनते.

भारतीय संविधान हे लोकशाही मूल्यांवर आधारित आहे. स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुत्व ही तत्त्वे देशाच्या प्रत्येक निर्णयाला दिशा देतात. शासनव्यवस्थेतील संतुलन राखणे, नागरिकांचे हक्क संरक्षित करणे आणि समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळू देणे, हे संविधानाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

२६ नोव्हेंबर हा दिवस संविधान स्वीकारण्याचा असल्याने देशभर 'संविधान दिवस' म्हणून पाळला जातो. या दिवशी संविधान निर्मात्यांच्या कार्याचा गौरव केला जातो आणि नागरिकांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.

भारतीय संविधान हे केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून, देशाच्या लोकशाही प्रवासाचे मार्गदर्शक तत्त्व आहे. राष्ट्राच्या प्रगतीचा भक्कम पाया म्हणून ते आजही तितक्याच दृढतेने देशाला दिशा देत आहे.

**टीम आपलं मंत्रालय**

# एरनाकुलम संग्रहालय















(सर्व छायाचित्रे : अजय भोसले, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग.)


# लिहिते व्हा... आपलं मंत्रालय





माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'आपलं मंत्रालय' (डिजिटल आवृत्ती) तयार करण्याचे नियोजित आहे. मंत्रालयातील विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी आपल्या कथा, कविता, स्वानुभव, पाककला, भ्रमंती, व्यंगचित्रे, विशेष छायाचित्रे; तसेच विभागातील पदोन्नती, निवृत्ती याबद्दल 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेसाठी लेखन साहित्य *(युनिकोड वर्ड फाईल स्वरूपात)* खालील दिलेल्या ई-मेलवर पाठवावेत.













## आपलं मंत्रालय

प्रकाशने शाखा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, १७ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई. ई-मेल : **aaplemantralay@gmail.com**

**Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR**
**Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR**